प्रधान, सेनापती, मानकरी, उपाध्यबोवा, जोशी, उभयतां पुत्र आदिकरून मंडळीसुद्धां राजा विनोदी भाषण करीत असतां त्यास स्मरण झालें. तेव्हां तो संपूर्णांस उद्देशून म्हणाला, अहो या मुलांनीं परक्यांच्या मुलीं त्यांच्या प्रीतीच्या मनुष्यांतून आपल्या मोहकतेनें त्यांचीं मनें आकर्षून त्यांना काढून आणल्या, तेव्हां त्यांना हा प्रस्तुत कारागृहवासच समजावयाचा. कारण, त्यांचा कोणाचा परिचय नाहीं. आणि इच्छीत हेतुही सिद्ध नाहीं. तर सुमुहुर्त पाहून वधुवरांचें ऐक्य सत्वर करावें. उपाध्येबोवा मुहुर्त पहा. उपाध्ये, जोशी बकासारखें टपून बसलेलेच. विलंब कशाला, लागलीच मुहुर्ताची तयारी. ही तत्परता पाहून प्रधानानें हस्त जोडून विनंती केली.

प्र प्र०—सरकार आपणांस दोन कार्यें कर्तव्य असून दोन्ही अन्यपुरांत जाण्याचीं आहेत. व हीं दोन्हीं मंगलकार्यें एकदम व्हावींत असा सर्वांचा हेतु आहे. तेव्हां त्यास उपाय असा करावा कीं, या अडचणी मुळें आतां आपणांस उचलून जाणें होणार नाहीं. याज कीरतां उभयराजांना आपलीही अडचण [उभयतांचीं लग्नें त्यांच्या मित्रत्वाप्रमाणें एकदम व्हावीं हें इष्ट] कळवून आपणच उभयतांनीं येथें यावें, म्हणजे सकल जनांच्या मनोगताप्रमाणें घडून येईल, अशा अर्थाच्या लग्नपत्रिका त्यांस पाठवाव्या. व त्यांना येण्यास जितका काळ लागेल, त्यापेक्षां आठ दिवस मुहुर्त पुढें धरावा.

याप्रमाणें प्रधानाचें ह्मणणें सर्वांस मान्य झालें. व पत्रिका पाठविण्याचा बेत ठरवून पत्रिका तयार करण्यास प्रधानजीस हुकूम झाला. प्रधानजींनीं पत्रिका तयार करून आणल्यावर त्या वाकिलांच्या स्वाधीन करून त्यांना इतमामासह रवाना केलें.

नंतर सर्व कामगार लोक कार्याच्या तयारीस लागले. प्रत्येकाकडे कामें निरनिराळीं सोंपवून त्या त्या कामांची जबाबदारी खुद्द ज्याची त्याजवर ठेविली असल्यामुळें जो तो आपापलें काम काळजीनें लक्ष्यपूर्वक जलदीनें करूं लागला. खुद्द मंडपाचें काम प्रधानजीच्या देखरेखीखालीं सुरू झालें. आधींच प्रधान त्यांत कुशळ कारागीर मग त्या मंडपाच्या कामास काय पहावयाचें आहे. आठ दिवसांत बहुतेक काम पूर्ण झालें. त्या भव्यमंडपाची शोभा अवर्णनिय होती. आंत प्रवेश केला असतां आपण कोणत्या स्थळीं आलों आहोंत याची कल्पना सुद्धां करवत नसे. कारण, ज्यास जशी आवड तशी तेथें व्यवस्था केलेली दिसावी. तेव्हां मनुष्यास आश्चर्यानंद कां बरें होणार नाहीं. सुंदर मृदु बैठका, योग्यतेनुरूप समोरच्या भागांत सिंहासनें, सभोंवती पुरुषभर उंचीचे सुरेख पुसलेले आयने, किनखाबी भरजरी पडदे, वर स्वच्छ व शुभ्र आरशांचें छत, त्यांतून एकास एक लागून हंड्या झुंबरांचा लखलखाट, वालसिटें चिमण्या यांचा चकचकाट, सुगंधी पदार्थांचा घमघमाट, सभोंवार सुंदर हिरव्या

रंगाच्या वेलींचें वेष्टण असोन सारख्या रांगेनें सुवा-
शिक पुष्पांच्या कुंड्या ठेविल्या होत्या. त्यामुळें
स्वाभाविक आंतील हवागार असे. याप्रमाणें त्या
मंगलकार्याची सर्व सिद्धता झाली.

मदनराय राजाचा वकील बरोबरच्या लोकांसह **अनंगपुरास** येऊन पोहोंचला. **कुसुमचाप** राजानें त्याचें आदरातिथ्य चांगल्या प्रकारें केलें. आणि म्हणाला, बहुत दिवसांनीं **मदनरायां**कडून हा आमचा सत्कार झाला आहे. यावरून यांत कांहीं तरी गुप्त हेतु असावा असें दिसतें. तेव्हां वकिलानें ती विवाहपत्रिका सादर केली. प्रधानजीनीं वाचली. तिच्यांतील आशय येणेंप्रमाणें:—

॥ श्री ॥

स्वस्तिश्री सकळ गुणैश्वर्यसंपन्न अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री **कुसुमचाप** राजे मुक्काम **अनंगपूर** यांसः—स्नेहंकीत **मदनराय** राजे मुक्काम **क्रीडावती** यांजकडून आनंदकारक शुभवर्तमान कळविण्यांत येत आहे. त्याचा सर्वांनुमतें योग्य व पूर्ण विचार होऊन त्याप्रमाणें सत्वर सिद्धता करून प्रयाण व्हावें. आमचे चिरंजीव **मदनबाण** यांस सृष्टीसौंदर्य आदिकरून विश्वचमत्कार पाहण्याची उत्कंठा होऊन ते आपला मित्र **रूपसुंदर** या समवेत मृगयेच्या मिषानें नाहींसे झाले होते. त्यांची व आपली प्रिय कन्या जी पुष्पावती तिची मार्गांत **भद्रपुरीं** गांठ पडून उभयतांच्या मनोदयानुरूप गोष्टी घडून आ-

ल्या. व परस्परांचे मानसिक विवाह झाले आहेत. सर्व सुखरूप येथें येऊन दाखल झालीं आहेत. शास्त्रोक्त विवाहविधी करण्यास्तव आह्मी आपल्या दुहितेस घेऊन अनंगपुरीं यावें; हा मार्ग उक्त खरा. परंतु वरील नगरांतील प्रधान सुतेनें आमचे प्रधानपुत्र रूपसुंदर यांस एक निष्ठेनें वरिलें असोन तेंही उभयतांच्या इच्छेप्रमाणें झालें. व तीही आपल्या कन्ये समागमें येथें आली आहे. त्यांचीं आणि सर्वत्रांची इच्छा हीं मंगलकार्यें एकाकाळीं व्हावींत असा आहे. दोन्ही ठिकाणचे संबंध एकदम साधण्याची युक्ति आपण उभयतांनीं कृपाकरून येथेंच येऊन कार्यसिद्धी करावी. याप्रमाणें भद्रपूरच्या राजांनाही पत्रिका पाठविली आहे. तेव्हां आपण सकलांचे मनोरथ पूर्ण कराल अशी आशा आहे. मुहुर्त जवळचाच धरला आहे. तरी पत्रिका पोहोंचताच निघण्याची तयारी करावी. समक्ष सर्व हकीकत श्रुत होईल. रागास येऊं नये, लोभ आहेच, ही विज्ञप्ती. मित्ती वैशाख शु० १ शके १८

आपला.

मदनराय नृप मु० क्रीडावती.

याप्रमाणें प्रधानजीनीं पत्र वाचल्यावर राजादि करून संपूर्णांना बहुत संतोष झाला. आपली आवडती कन्या जीवंत असून एका सुंदर कुलीन व सज्जन राजपुत्रास वरीत आहे, फार चांगलें झालें. ही सुवार्ता जनानखान्यांत कळतांच सर्व स्त्रिया आनंदानें

डोलूं लागल्या. **विसासरंभा** राणीच्या डोळ्याचें पाणी खळलें नव्हतें. तिला बहुत सुख झालें. तिनें सुवाशींनीना हळदकुंकुं देऊन नारळानें त्यांच्या ओंट्या भरल्या. त्यांना पैठण्या लुगडी कंचुक्या दिल्या. राजानें सर्व तयारी करवून मार्गे चांगला बंदोबस्त ठेवून **क्रूरसेनासहीत** मोठ्या थाटानें **क्रीडावतीस** येण्यास निघाला.

भद्रपुरींतील राजाला पत्रिका पोहोंचताच तोही प्रधानजीच्या मनाप्रमाणें सिद्धता करवून बंदोबस्तानें लष्करासुद्धां निघाला. मार्गांत उभयतांच्या गांठीं पडल्या. नंतर दोन्हीं राजाचीं लष्करें एके ठिकाणीं झाल्यामुळें तो समारंभ अलौकिक दिसूं लागला. ही बातमी **मदनरायास** कळतांच तो त्यांना सामोरा गेला. व त्यांना नगरांत आणून त्यांची व्यवस्था उत्तम प्रकारची ठेविली. **पुष्पावतीची** व **विलासरंभेची** भेट झाली. आज जगांतून नाहींशी झालेली आपली आवडती देवाच्या दयेनें व पूर्व पुण्याईनें आपल्यास मिळाली. हा देवाचा आपल्यावर केवढा प्रसाद आहे. येणेंप्रमाणें परमेश्वराचे उपकार स्मरून मग लग्नाच्या कामाकडे त्या स्त्रिया वळल्या तें सर्व स्त्री राज्यच त्यांची जी धांदल उडाली ती कांहीं पुसूंच नये. कोणी ह्मणते रुखवतच पुरतें नाहीं. कोणी ह्मणते विहिणींच्या मानाला फार जपलें पाहिजे. अशी एकच गर्दी उडून गेली आहे.

मदनराय राजाच्या एकुलत्या एक पुत्राचें लग्न

तेव्हां राजाच्या योग्यतेप्रमाणें देशोदेशीचे राजे, प्रधान, मानकरी, अमीर, उमराव, ब्रह्मवृंद, हरदास, गवई, अतीत, अभ्यागत, यती, तापसी, गोसावी, बैरागी, गरीबगुरीब वगैरे सर्वत्रांना लग्नपत्रिका पाठवून या विवाहसोहळ्याकरितां आणलें होतें. ज्याच्या त्याच्या मनाप्रमाणें त्यांची बरदास्त अत्युत्तम प्रकारें ठेविली होती. मनोरंजनार्थ क्षणोक्षणीं निरनिराळ्या कलावंतिणीचें नृत्य गायन उत्कृष्ट चाललें होतें. शास्त्ररीत्या सीमोल्लंघन होऊन भेटी नंतर जामातांची पूजनें झाल्यावर त्यांस पोषाख अर्पण करण्यांत आले. विप्रादि गरिबांना दक्षणा वांटली. विडे पानसुपारी होऊन जांवयाना मिरवीत नगरांत आणिलें. रस्त्यानें सर्वोत्कृष्ट प्रकारची तऱ्हेतऱ्हेची रंगीबेरंगी दारु लाखो रुपयांची सुटली. तेणेंकरून पहाणारांना अत्यानंद झाला. दुसरें दिवशीं वाग्निश्चय होऊन रुखवताबरोबरच वरांना आणण्याकरितां शृंगारलेले गज गेले होते. स्त्रियांच्या हौसेप्रमाणें रुखवतीचा सोहळा चंद्रज्योतिसुद्धां यथास्थीत झाल्यावर त्या नारायणस्वरूपी वरांना मोठ्या टोलेजंग समारंभानें मिरवीत त्या सर्वोत्कृष्ट लग्नमंडपांत आणिलें. तेथें कलावंतीणींचें नृत्य गायन सुरू असून संपूर्ण राजे, प्रधान, मानकरी वगैरे व जनसमुदाय आपापल्या योग्यतेप्रमाणें, अधिकाराप्रमाणें आपापल्या स्थळीं विराजमान झाले होते. नवीन येत असलेल्या मंडळीचे, बरदास्त ठेव-

णारे कामगार आगतस्वागत करून योग्य ठिकाणीं बसवीत होते. असा, तो सत्ताधीश, पृथ्वीपती-च्या घरचा विवाह सोहळा त्याचें जेवढें वर्णन करावें तेवढें थोडेंच. वर्णधर्माच्या नियमाप्रमाणें मधुपर्कादि विधी होऊन सर्वोत्कृष्ट गोरज सुमुहूर्तावर देव, ब्राह्मण व अग्नि यांच्या समक्ष **मदनबाण पुष्पावती** आणि **रूपसुंदर चंपकमालती** यांचा यथोचीत शास्त्रोक्त विवाह लागला. त्या महदानंदाचें वर्णन कोण करणार? टाळी वाजल्याबरोबर पोषाख वर्खी विडे वर्खी वेलदोडे वर्खी लवंगादि सामान, हार, तुरे, गजरे वगैरे, सुवासिक पुष्पांचे पोषाख, अत्तर, गुलाब वगैरे सुगंधी द्रव्यें, देण्यास आरंभ झाला. व्यवस्था इतकी उत्तम होती कीं, अगदीं गडबड न होतां, व कोणास अमुक एक मिळालें नाहीं असा बोभाटा न होतां, सुरेख रीतीनें नेमिलेल्या कामगारांनीं आपापलीं कामें शेवटास नेलीं. द्विजादि गरिबांना भांडारखाना मोकळा करून दिला, व नेववेल तितकें द्रव्य न्यावें अशी सक्त ताकीद दिली. हें राजांचें औदार्य पाहून जन समाजाला बहुत संतोष झाला. नित्यशः लक्षावधि लोकांना मुक्तद्वार, सुग्रास भोजन मिळत असे. ब्राह्मणादि सकल जनसमुदायानें राजांचें अभिष्ट चिंतन करून त्यांस दुवा दिला. याप्रमाणें सारखा तो विवाह-सोहळा षोडश दिन अप्रतिबंध चालला होता. अनंग पुराधिश कुसुमचाप, त्याचा प्रधान शौर्यसागर, भद्रपुराधिपती चंद्रसेन व प्रधानांचे व्याही प्रधान

तेजपाळ त्यांचे पुत्र धैर्यानंद, तमाळ देशचा राजा क्रूरसेन (या मंगळकार्यांत त्याजबरोबर तह करून त्यास आपल्या देशीं जाण्याची परवानगी दिली.) व इतर राजे यांना अखेरची थोरली मेजवानी होऊन सर्व आपापल्या देशीं निघून गेले.

भाग सातवा.

आतां मदनबाण पुष्पावती व रूपसुंदर चंपकमालती हीं जोडपीं सुखपर्वताच्या शिखरावर विराजमान झालीं आहेत. प्रत्येकाच्या आवडीप्रमाणें व मनीषेप्रमाणें निर्विघ्नपणें ईश्वर प्रसादानें सर्व यथास्थितं घडून आलें. एके दिवशीं पुष्पावती आपल्या महालांत एकटीच बसली असतां तिच्या दासीनें ह्मटलें. बाईसाहेब, आपण पूर्वजन्मीं शंकर पार्वतीची पूजा चांगल्या भक्तीनें केली होती. ह्मणून या जन्मीं आपणांस हें अप्रतिम पती सुख प्राप्त झालें आहे. आपण भाग्यशाली व पुण्यवान खऱ्या.

पु०—अग काय सांगूं दासी, मला जेव्हां माझ्या माहेराकडील बसंतिका दासीनें इकडची तसबीर आणून दिली तेव्हांपासून याच गळ्याची शपथ माझं तन, मन, धन इकडं लागून राहिलं होतं, मी देवांना लाखो नवस केले. मनांत अक्षयीं विचार करीत असे कीं, मजला हे चरण कसे दृष्टीस पडतील. माझे माता-

पित्यास इकडं माझं मन लुब्ध झाल्याचं कोण सांगल. मी अशा घोरचिंतेनं वाळत चाललें. अन्नपाणी सुद्धां गोड लागेना. आणखी मनांत असेही तर्क येईत कीं, ज्याप्रमाणं मला या चरणाची प्रीति लागली आहे. त्याप्रमाणं तिकड मी आवडेन कां नाहीं कोण जाणें. मी या चरणावर भक्ति ठेविली आहे ही माझी खरी स्थिति तिकडं कशानं कळते. जगतामध्यें सुरूप स्त्रि-या थोड्या कां असतील ! दुसऱ्या सुंदरीनं तिकडचं मन कशावरून आकर्षण केलं नसल ! एखाद्या राजा-चा वकील आला ह्मणजे माझं मन उदास, चिंताग्रस्त आणि भ्रमिष्ट व्हावं. त्यामुळं एखादे वेळेस जेवतांना हातचा घांस हातांतच राहावा. आणि मी चिंतेत व्य-ग्र असावं. तेव्हां माझ्या आईनं ह्मणावं कां पुष्पावती तूं शुद्धींत आहेसका ! कोणीकडं चित्त गेलं आहे ! मग मी लाजल्यासारखं होऊन जेऊं लागावं. त्यांत तमाळ देशाच्या राजाचं ऐकल्यापासून तर माझं देह-भानच नाहींस झालं. आतां काय करूं. इकडची माझी गांठ कशी पडते. हें मजला कांहींच सुचेना. पण त्या हरतालिका पूजनाचं सार्थक झालं. गौरी-शंकराच्या पूर्ण कृपावलोकनानं माझ्या मनाप्रमाणं झालं. आतां माझ्या सुखाला काय विचारावयाचं आहे. म-नासारखा पती, राजसुख, प्राणवल्लभांची मजवर निष्क-पट प्रीति, मग मी सुखी कां असणार नाहीं. दासी, फार काय सांगूं, प्राणनाथांचं मजवर इतकं कांहीं वि-लक्षण प्रेम आहे कीं, बाहेरून आल्यावर कसलंही

वर्तमान मग तें दरबारी असो अथवा खाजगी असो. मला सांगितल्यावांचून राहावयाचंच नाहीं. वस्तु तर मला दिल्या खेरीज आपल्या प्रिय मातेला सुद्धां देणं व्हावयाची नाहीं. अग अगोदर माझी भेट घेतल्याशिवाय दुसरीकडं जाणं सुद्धां व्हावयचं नाहीं याप्रमाणं दासीचं व पुष्पावतीचं भाषण चाललं आहे तों मदनबाण महालांत आला. तेव्हां पुष्पावतीनें उठून नमस्कार केला. व प्रेमानं गळ्यांत हात घालून जवळ बसली. मुखकमलाला हात नों लावते तों.

म०--(थट्टेनें) अझून अंकावर बसण्याची हौस पुरी नाहीं कां झाली,तुमचं ठीकच आहे. परंतु दिवसंदिवस आह्मांस हा पुष्पभार सोसवला पाहिजे. त्यांत आतां आह्मी निःशक्त झालेलों, आमच्या शक्तीला अप्रतिहत वाहता झरा लागलेला. मग आह्मांला आतां हें कसें सहन होतें.

असें मदनबाणाच्या मुखांतील भाषण ऐकल्या बरोबर पुष्पावतीस राग आला. ती त्यास झिटकारून एकीकडे कोपऱ्यांत जाऊन उभी राहिली. व तोंडानें अर्धवत पुटपुटूं लागली.

पु०—इथं कोण खोळंबलं होतं. पण नित्यशः दूर उभं राहिलं ह्मणजे उगीच त्रास द्यावयाचा, ओढाताण करावयाची आणि जवळ बसवावयाचं असा रोजचा स्वभाव माहीत झालेला. त्यांत आज येण्याला विलंब झाला आहे. मुखकमल ही किंचित उतरल्यासारखं दिसळं. ह्मणून बाई वर्तमान विचा-

रण्या करितां जवळ आल्यें. तों इकडं तिसराच प्रकार आमचा स्त्रियांचा स्वभाव पडला ना कोमल. इकडं नखाला दुःख झालं कीं, आमचं काळीज कर्वतून जातं. परंतु इकडं काय त्याचं खरंच बाई पुरुषांची जात निष्ठुर ह्मणतात, ती कांहीं खोटी नाहीं.

म०—शाबास सुंदरी, विनोदानें सहज दोन शब्द बोललों. त्यावर तूं इतकें पांडित्य चालविलेंस! तूं तरी वाक्चातुर्यांत निपूण आहेस. पंचकन्यांचा आशीर्वाद त्यांत आणखी हरतालिकेचा प्रसाद मग काय तुला स्फूर्ति कमी कशी असणार. तुझ्या सारख्या दोन चार स्त्रिया एके जागीं झाल्यावर मला वाटतें मोठ्या विस्तीर्ण राज्याला हात घालून गगन सुद्धां खालीं आणतील. फार काय आपल्या वक्तृत्वानें मोठ्या पंडितास सुद्धां हर आणतील.

पु०—पुरं मेलं माझी आतां थट्टा करावयास नको. मी आपली अगदीं वेडी खुळी आहे. कुणीकडून बोलल्यें कुणाला ठाऊक. लोकाला मात्र पाहिजे तशीं विशेषणं देऊन हवं तें म्हणावं, आणि इकडं काय कमी आहे. मी यांत आपल्याला असं काय तरी बोलल्यें होतें पण लागलीच दुसऱ्याला कसपटाप्रमाणं करून टाकलं. मला कां समजत नाहीं, अहिल्या द्रौपदीच्या पंक्तीला मला बसविलं, त्यांची योग्यता कुणीकडं. आणि मी यःकश्चीत मृत्युलोकची कलियुगांतील अबला स्त्री कुणीकडं. त्यांची माझी कशाला बरोबरी हवी आहे. या बोलण्यांतला

मतलब मला नाहीं कां कळला; शालजोडींतलं हें बक्षिस. तूं फार चांगली आहेस ह्मणजे अगदींच गचाळ आहेस, असा अर्थ.

म०—आतां बोवा शर्थ झाली. खरोखरीच तुझ्यासारखी चतुर स्त्री ज्यास सुकृतानेंच मिळाली तो धन्यच समजला पाहिजे. त्यांत राजपुरुषास अशा सज्ञान स्त्रीचें सहाय्य असल्यावर त्यास बहुत करून चिंता करणेंच नको. एका कवीनें म्हटलें आहे. श्लोक " संसार ताप दग्धानां, त्रयोविश्रांति हेतवः ॥ अपत्यंच कलत्रंच, सतांसंगतिरेवच " तद्वत खरोखर तूं आहेस. प्रिये, मी तुजला या वेळेस सत्य सांगतों. व आजपर्यंतच्या माझ्या आचरणावरून तुझीही खात्री झालीच असेल. अशीं मनमिळाऊ स्वभावाचीं नम्र व सत्यवादि मनुष्यें मला फार आवडतात. रूपसुंदराचा माझा तरी इतका स्नेह जडण्यास कारण वरीलच होय. तूंच विचार कर कीं, तुह्मी आमच्या अर्धांगीं आहांत, आह्मीं आपला निमे कार्यभाग तुमच्याकडे सोंपविलेला आहे. तेव्हां त्या निमे कर्तव्याचा तुह्मीं योग्य व्यय केला पाहिजे. ह्मणजे तो तुम्हां आम्हां उभयतांस चांगला फलद्रूप होऊन उभयतांस ही अनुपम्य सौख्य होईल. यास थोडासा दृष्टांत सांगतों. एक ब्राह्मण होता तो उदरपोषणाकरितां राजाश्रित बनला. दिवसभर त्यास राजदरबारांत मनस्वी काम पडे. त्यामुळें तो थकून जाई. तेव्हां वास्तविक अशा पुरुषास

सुख कसें होणार, तर वरील श्लोकांत सांगितलेल्या तिन्ही रीतींनीं परंतु दुर्दैवानें अपत्य नाहीं व सत्समागमही नाहीं. तेव्हां तो जर आपल्या गृहीं आला आणि त्याच्या स्त्रियेनें नम्रतेनें प्रीतीपूर्वक मधुर भाषणानें जर त्याचें शांतवन केलें, तर त्यास किती बरें सुख होईल. नाहीं तर आल्याबरोबर कपाळाला आंठ्या घातल्या, हातपाय आपटायला लागली, उदक प्राशनार्थ मागितलें असतां इथं कुणाला आणायला बळ आलं आहे, तहान लागलेली ठाऊक नव्हतीकां, मग येतांना नदीवरून कां पिऊन येऊं नव्हतं. असें म्हटलें, म्हणजे त्यास कसें वाटेल, हें तूंच सांग पाहूं. खरोखर यापेक्षां त्यास मृत्यु बरा वाटेल. "तर मनमोहिनी खचित तुझें वर्तन स्तुत्य असून मला फार प्रिय आहे. तर ये अलीकडे, बैस. आतां उगीच त्या कोमल चरणांना कष्ट देऊं नकोस.

पुष्पावतीस वरील भाषणानें अगोदर हसूं येतच होतें. त्यांत हा आग्रह, मग उशीर कशाला. आवडतें तेंच पुढें. लागलीच शेजारीं येऊन बसली. हस्तानें मुखाचा घर्म पुसला. व करून ठेवलेला त्रयोदश गुणी तांबूल मुखांत घातला.

पु०—आज कुणीकडं जाणं झालं होतं. चेहरा कां इतका म्लान झाला आहे. कां एखादी शिकार केली. नकोग बाई (गळ्यांत हात घालून) प्राणनाथ मी आपणास पदर पसरून सांगतें कीं, आपण हा नाद फारसा बाळगूं नका. आतां आपलं कर्त-

ल्यच आहे. तेव्हां एकादे वेळेस जावं. प्राणेश्वरा, सर्व वेळा सारख्या का असतात, परवांची आठवण झाली कीं, माझ्या आंगावर कांटा येतो. (इतकें ह्मणतच डोळे झांकते व त्याच्या कमरेस मिठी घालते.)

म०—सुकुमारे भिऊं नको. अग आतां येथें कां तो व्याघ्र आला आहे. छेः छेः स्त्रिये तूं असें भित्रेपणाचें भाषण बिलकूल करूं नको. अगे वीरपुरुषांचीं कामें काय. आमचा जन्म कशाकरतां ह्मणसील तर दुष्टांचा नाश व सज्जनांचें रक्षण करण्याकरितां आहे. प्रिये ज्या दुष्ट प्राण्यांपासून साधु लोकांस पीडा होईल त्यांचा नाश केलाच पाहिजे. मी इतकावेळ समजत होतों कीं, जशी तूं वक्तृत्वांत निष्णात आहेस, तशी पराक्रमांतही अससील. पण छेः तूं अगदीं भीरु आहेस. हो बरी आठवण झाली, मग मुशाफर वेष धारण करून घोडेस्वार कशी बनलीस.

पु०—प्राणवल्लभा, प्रसंग पडल्यावर सगळं होवं. आमची एक बायकांची क्षुल्लक म्हण आहे " जात्यावर बसली म्हणजे ओंवी आठवते " त्याप्रमाणं प्रसंगानुरूप मनुष्य तरबेज आणि धीट होतंच. असो प्राणप्रिया आज कुणीकडं जाणं झालं होतं!

म०—प्राणसखे, आज म्हणजे मोठेंसें काम केलें, असें कांहीं नाहीं. बावांसाहेबांनीं कुमारोद्यानांतील शिवालयाच्या जिर्णोद्धाराचें काम पाहून येण्यास सांगितलें होतें; तिकडे गेलों होतों. सखे तें स्थळ

रम्य तर खरेंच. परंतु लांब फार, येथून पक्के तीन कोस आहे. अहाहा ! कारागिरांनीं काय सुरेख काम केलें आहे. उद्यानाची ही शोभा अपूर्व आहे.

पु०—हो बरी आठवण झाली. आपण मागें एकदां मला वचन दिलं होतं कीं, तुला कुमारबागेंत श्री गौरिशंकराच्या दर्शनास नेईन; व लागलीच येतांना तिकडचीं सुंदर स्थळं दाखवून आणीन. त्याची कशाला आठवण होते. अनायासा आज जाणं झालं होतं. मला नेऊं कां नव्हतं बरोबर.

म०—प्रिये, काय सांगूं माझ्याही मनांत न्यावयाचें होतें. परंतु आज बरोबर मंडळी फार होती. असो उदईक खचित तुला घेऊन जाईन. आतां बाबांसाहेबांकडे जातों. तर एकदां जातांचा (असें ह्मणून तिचें मुखचुंबन घेऊन निघून जातों.)

दाशी (आंत येते)—बाईसाहेब खरंच आपण सांगितल्याप्रमाणं सरकारची आपल्यावर प्रीति आहे. देवानं आपणा दोघांना पुष्कळ अयुष्य चालावं. आणि लौकर आम्हांला खेळवायला एखादा पुत्र द्यावा; म्हणजे आमच्या जन्माचं सार्थक झालं.

भाग आठवा.

मागील साहाव्या भागांत वर्णिल्याप्रमाणें क्रूरसेन हा आपल्या नगरीं निघून गेला. तेव्हां त्याच्या

प्रधान सेनापती वगैरे अधिकाऱ्यांनीं त्याचा चांगल्या-प्रकारें सत्कार करून त्यास आनंदानें नगरांत नेलें- दरबार भरवून उत्कृष्ट समयोचीत भाषण करून राजाचें समाधान केलें. विप्रांना वर्षासनें दिलीं. अनुष्ठानें उठविली. त्यांचीं उद्यापनें करवून ब्राम्हण संतर्पणेंही चांगलीं केलीं. परंतु राजास हें कांहींच गोड लागलें नाहीं. तो जो एवढा अभिमानानें आणि आपल्या कवाईत शिकलेल्या फौजेच्या भरंवशानें गेला होता, ती गोष्ट सर्वच विपरीत झाली. कारागृहवासाचें दुर्धर दुःख सोसावें लागलें, त्या सुंदर रमणीस अखेर त्या क्रीडावतीच्या राजपुत्रानें वरिलें, व त्या चांडाळ कार्टीनें आपलें दुष्टपण अशा रीतीनें शेवटास नेलें. त्यामुळें राजास अन्नपाणी गोड लागेना, फार काय निद्रासुद्धां येईना. त्या हृद्रोगानें काष्टासारखा शुष्क झाला. हें पाहून प्रधान, सेनापती यांनीं अनेक उपचार केले; मनोरंजनाचे सुरेख खेळ चालविले; परंतु कोणत्याही प्रकारानें राजास चैन पडेना.

एके दिवशीं प्रधान हस्त जोडून म्हणाला: सरकार, आपल्या प्रकृतीची भावना तरी दासाला कळवावी; ह्मणजे त्यावर जालीम उपचार सुरूं करून एका आठ दिवसांत महाराजांना चांगलें बरें करितों. तेव्हां राजा प्रधानास म्हणाला, या उपायांनीं मजला कांहीं एक व्हावयाचें नाहीं. मी हृद्रोगानें अंतरीं जळतों आहें, त्यास जर उपाय करशील तर माझी तब्यत तात्काळ

चांगली होईल. तो दुष्ट राजपुत्र मदनबाण आणि त्यास वरणारी ती चांडाळ कारटी पुष्पावती यांचा सूड घेशील तर माझें अंतःकरण समाधान पावेल. हें राजाचें भाषण ऐकतांच प्रधान (मनांत) (मजला माहीतच होतें कीं, हे राजश्री खुनशी व पाषाण हृदयी आहेत आतां तोंडावर होय ह्मटलेंच पाहिजे. नाहीं तर कदाचित संतापवायु होऊन सरकार स्वर्गस्थ सुद्धां व्हावयाचे असा विचार करून) (उघड) सरकार आपण कांहीं चिंता करूं नका. थोड्याच काळांत सैन्याची सर्वोत्कृष्ट तयारी करवून नवीन फौज वाढवून त्याजवर एकाएकीं छापा घालतों, उभयतांस कैद करितों, व चरणापाशीं घेऊन येतों. असल्या क्षुद्र गोष्टीविषयीं इतकी घोरतर चिंता बाळगणें आणि आपल्या अशा सुकुमार तनूची हानी करणें आपल्या सारख्या प्रतापी राजास योग्य नाहीं. हें प्रधानाचें शूरपणाचें, धैर्याचें व निश्चयाचें भाषण श्रवण करून राजास धीर आला व संतोष झाला. त्यानें प्रधानास सक्त हुकूम दिला कीं, सैन्याप्रीत्यर्थ सगळा भांडारखाना मोकळा झाला तरी हरकत नाहीं. पण फौज वाढवून युद्धाची तयारी फार त्वरित करा. त्याचप्रमाणें युद्ध सामुग्री सर्व नवी आणून तीक्ष्ण धारेचीं शस्त्रें सैन्यास द्या. प्रधानानें होय म्हणून सांगून कोणीकडून तरी या वेळेस त्याचें समाधान केलें. तेव्हां सरकार स्वारी संतुष्ट होऊन महालांत निघून गेली.

प्र०—(आपणाशींच) काय हा दुष्ट, छांदिष्ट,

एककल्ली, निर्दय व महात्वाकांक्षी स्वभाव. काय करावें सर्पास कितीही प्रेमानें वागविलें, तरी तो आपली कृति केल्याखेरीज राहणार नाहीं, आमच्या सरकारास वेड तर लागलें नाहीं ना ? जोपर्यंत आमचे लोक मरेन किंवा मारीन अशा खऱ्या स्वाभिमानानें लढण्यास तयार झाले नाहींत, तोंपर्यंत आमच्या हातून शत्रूचें कांहीं एक होणार नाहीं. आणि फौजेनें अशा प्रकारचा आपल्या देशाचा व राजाचा अभिमान बाळगण्यास सरकारांनीं आपलें दुराग्रही वर्तन सोडून प्रजेस प्रेमानें पुत्रवत् वागविलें पाहिजे. परंतु हीं व्युत्क्रम प्रमाणाचीं वर्तनें कधींही सम व्हावयाचीं नाहींत. कारण, आमचे राजेसाहेब दुर्वर्तनास तेव्हांच प्रवृत्त होणार. तेव्हां प्रजा त्यांच्या नाशाविषयीं वाट पहात तिळांजळी घेऊन बसलेली आहे. राजपुरुषास व्यभिचार फार नाडतो. त्या योगानें प्रजा असंतोषी होते. आमची फौज कवाइती कामांत हुशार आहे. परंतु उपयोग काय ? युद्धाच्या वेळेस बुद्ध्याच कुचराईनें लढतात, त्यामुळें आम्हांस यश प्राप्त होत नाहीं. ज्या वेळेस आह्मी कुसुमचापावर चालून गेलों, त्या वेळेस आमची फौज थोडी का होती ? पण काय फळ ! आपापसांत द्वेष, खुद्द सरकारावर अप्रीति, तेव्हां जीवाची आशा सोडून काम करितो कोण ? त्या वेळेस कुसुमचाप राजा एकटा तरी होता. परंतु आतां मदनराय राजास त्याच्या इतर संबंधी जनांचें

सहाय्य असोन शिवाय या नूतन राजांचें उत्तम पाटबळ. मग त्या मदनबाण राजपुत्राचें आमच्या सरकारच्या हातून काय पारिपत्य होणार आहे. मागील कारागृहवासाचें स्मरण अझून बुजलें नाहीं, तांच दुसरा एखादा जन्मपर्यंतचा नर्कवास पाहिजे असावा, असें दिसते. “विनाश काळीं विपरीत बुद्धि.” प्रारब्धीं असेल त्याप्रमाणें मनुष्यास इच्छा उत्पन्न होते; व त्याचें फळही तसेंच मिळतें. असो, आपण जर एक निष्ठेनें राज्याची सेवा करण्याचें पत्करलें आहे तर आपणास फौजेची तयारी केली पाहिजे. पुढें जें होणें असेल तें होवो.

भाग नववा.

आमच्या रूपसुंदराच्या चरणीं तन्मय झालेल्या व पूर्ण यौवनदशेंत आलेल्या चंपकमालतीचें व तिच्या भ्रताराचें थोडेसें भाषण श्रवण करणें योग्य आहे. इतकावेळ आपण मदनबाण व त्यांची अत्यंत प्रिय कांता पुष्पावती यांच्या मंजुळ भाषणांत गर्क झालों होतों. तें ही ठिकच आहे. कारण, नायक व नायिका यांच्या पुढें इतर तुच्छ होतात. धन्याला जसा मान मिळतो तसा त्याच्या आश्रिताला मिळणें फार दुरापास्त आहे. परंतु आमचा रूपसुंदर तशा प्रकारचा केवळ आश्रित नसून परम जिवलग मित्र होता.

त्यामुळें मदनबाण त्यास आपल्या बरोबरीचा भाऊं असें मानीत असे.

एके दिवशीं उभयतां स्नेही रात्रौ उष्मा फार होऊं लागल्यामुळें बागेंतील कारंज्याच्या थंड हवेंत जाऊन बसले होते. हें त्यांच्या योषितांना ठाऊक नव्हतें. नित्याप्रमाणें चंपकमालती महालांत आली, तों जिकडे तिकडे हंड्या झुंबरें यांचा स्वच्छ शुभ्र प्रकाश त्या सुंदर आयने महालांत रमणिय दिसत असून मंचकावर सुगंधी पुष्पांची मृदु शय्या सुरेख केलेली आहे. त्याचप्रमाणें हार, तुरे, गजरे, अत्तरदाण्या, गुलाबदाण्या, केशरीउटी, गुलकंद, मोरआंवळा, मेवा मिठाई, फळफळावळ, त्रयोदशगुणी वर्खी विडे तयार करून चांदीच्या नकशीदार तबकांत व्यवस्थेनें ठेविलेले आहेत, तशींच सुवासिक सरबतें, थंड उदक जेथच्या तेथें भरून ठेवलेलें आहे. ती दासीची उत्कृष्ट तयारी पाहून तिजला बहुत संतोष झाला, ती ह्मणाली, सेवक माणसें असावीत तर अशी कुशल कार्यतत्पर असावीं. नाहीं तर यजमानांनीं सांगावं एक आणि चाकरांनीं करावं भलतंच. असो आज प्राणनाथ कां बरं अझून आले नाहींत. (दाशीस हाक मारून) कायग दाशी प्राणवल्लभ अद्याप मंदिरांत आले नाहींत वाटतं ! आज कां बरं उशीर झाला ! अग भोजन झाल्यावर तिकडं माझा वियो-

ंग क्षणभर मुद्धां सोसत नाहीं. लागलीच तांबूल हस्तांत घेऊन जवळ उभं असलंच पाहिजे. नाहींतर घाबरे होऊन शोध करायला लागतात. आणि मलाही तो मुखचंद्र पाहिल्यावांचून चैन पडत नाहीं. असं असून आज कुणीकडे स्वारी गेली.

दा॰— बाईसाहेब महाराजांची स्वारी गालीचावर येऊन लोडाशीं टेंकून जों बसते तों मदनबाण सरकारा कडील बोलावणं आलं कीं, आतांच्या आतां बोलावलं आहे. तेव्हां तसेच उठून लगबगीनें निघून गेले. विडासुद्धां खाल्ला नाहीं.

चं॰— आज मध्यंतरीच पाचारण करण्याचं कारण काय असेल तें असो. मलाही आज महालांत येण्यास उशीरच लागला. कसं करावं आज सासऱ्याहून वन्सं आल्या आहेत; त्यांनी बसवून घेतलं; मग कसं यावं. प्राणनाथांच्या अगोदर आपण तरी कसा विडा खावा, निद्रा तरी कशी घ्यावी. मला तर बाई झोंपेनं अगदीं ग्रासलं आहे. त्यांत कालचं जाग्रण मी नको नको ह्मणत असतां प्राणनाथानीं मला बळंच जागविलं. पण दाशी कालचा खेळ सुरेख झाला खरा. कायग बाई त्या मुलानं सोंगाची बहार करून भाषणाची कमाल केली. आमच्यानं नाहीं बाई असं बोलावयाचं, अगत्यानं

जेव्हां वल्लभापासून वचन घेतलं, त्यावेळेस बों-लण्याची जी खुबी, नम्रपणा आणि मोहकता केली, ती कांहीं पुसूं नको. त्यानें त्याच्या त्या नखरेदार भाषणास भुलून लागलीच कीग वचन दिलं. शाब्बास बाई त्याची. मला तेव्हां प्राणनाथानीं वि-नोदानं म्हणावं तुम्ही असच केलं आहे, आठवण करा. दाशी मला बाई तेव्हां लाज वाटं. आह्मी वचन घेतलं ह्मणून सगळ्या लोकांत असे कां चाळे केले होते. असो, दाशी मी आतां येथेंच बैठकीवर थोडीशी लवंडते, प्राणेश्वर आले ह्मणजे मला जागें कर, विसरूं नको हो. नाहीं तर तूंही तिकडे कोपऱ्यांत झोप घे. ह्मणजे दोघींची चांगली पूजा होईल.

दाशी०—मी कशी निजेन पण, आपण स्वस्थ निजा, मी खडापाहरा करते, नंतर **चंपकमालती** तसीच बैठकीवर निजली. इकडे क्रिडावनांत दोन-प्रहर रात्रपर्यंत हवा घेऊन उत्तर रात्रीं अंमळ तलखी कमी झाल्यावर थंड वाऱ्याची ती शरीरास आल्हाद देणारी झुळूक येऊं लागली. तेव्हां हे दोघे आपल्या मंदिरांत येण्यास निघाले. रात्रही बरीच झाली अस-ल्यामुळें व उभयतांसही निद्रेनें ग्रासल्यामुळें ते आपल्या महालांत गेले. **रूपसुंदरास** पाहतांच दाशीनें लगबगीनें जाऊन **चंपकमालतीस** जागें केलें. आणि सांगितलें उठा. माहाराजांची स्वारी आली. **चंपक-मालती** घाबऱ्या घाबऱ्या उठून उभी राहिली तोंच **रूपसुंदर** आंत येऊन लागलाच मंचकावर जाऊन

बसला हें पाहून चंपकमालतीस थोडें नवल वाटलें. तशीच उभी राहिलेली पाहून–

रू०—कां प्रिये, अजून तूं निद्रिस्त झाली नाहींस वाटतें; बाहेर दोन प्रहर रात्र होऊन गेलेली असून हे दिवे जसेच्या तसेंच प्रकाशीत आहेत. तांबूल आदिकरून सामान जसेंच्या तसेंच आहे. यावरून तर अद्याप यांतलें ग्रहण केलें नाहींस वाटतें. असो. ये, बैस. आतां उभी राहूं नको. आपल्याला बोवा फार झोंप येते, सखे. ये चल, आतां निद्रा घेऊं.

चं०—हो, बर आहे. तुम्ही दोन दोन प्रहर रात्रीं पर्यंत दुसऱ्याला जागवून बाहेर फिरावं, आणि मग झोंप येती म्हणावं ठीकच आहे. आमचा मेला स्त्रियांचा जन्म पडलांना अंकीतपणाचा, आह्मांस असंच कुचवत राहिलं पाहिजे. आह्मी कुठं कालच्या सोंगांतील स्त्रियांसारख्या चवचाल आहोंत कीं, आपणांस अर्पण केल्यावांचून अगोदरच आपण भक्षण करावं. असं जर करायचं असतं तर हट्टानं हे चरण कधींच वरले नसते. पण जसं चरणीं प्रेम निष्टेचं जडल तसंच सर्व.

रू०—आतां हें तुमचें आख्यान बहुतेक रात्रभर लागणार. आणि आपल्याला तर झोंप येते. कालच्या जाग्रणामुळें मजला आज मुळींच बाहेर जावयाचें नव्हतें. परंतु राजपुत्रापुढें इलाज चालेना. ह्मणून मुकाट्यानें तसाच पेंगत पण गेलोंच. बरें ये, बैस तर खरें, बसून काय बोलावयाचें असेल तें बोल. करतां काय, जशी कालची संबंध रात्र जाग्रणांत गेली

तशीच आजचीही समजूं. तर ये. आतां मला उं-
ठण्याचा त्रास देऊं नको.

च०—खरंच तें, आमच्यापासून त्रासच व्हाव-
याचा. मग जवळ त्रास कशाला पाहिजे. निजावं
स्वस्थ. मी आपली येथें खालींच निजते. कोणाच्या
झोंपे आड येऊं नये, त्यांत पातक आहे. असं मी
पुराणांत ऐकलं आहे.

रू०—आह्माला माहितच तें. आतां भारत, भा-
गवत, रामायण, स्कंदपुराण, काशिखंड, यांतील सर्व
कथा चालावयाच्या तात्पर्य तुमच्या मनांतून आह्मी
उठल्या शिवाय कांहीं मंचकावर यावयाचें नाहीं. असो
तूर्त आपल्याला गरज. (असें ह्मणून मंचकावरून
खालीं उतरून तिजला उचलून पलंगावर बसवितो.)

चं०— असं काय बाई तरी हें. हे पोर खेळ
आतां जाणार तरी कधीं ? त्या दाशी काय ह्मणतील.
खोंचून कशाला बोलायला पाहिजे. मी येण्यास
नाहीं कां ह्मणत होतें. पण आपणांस धीर कुठंय?

रू०— एकून आह्मांसच धीर नाहीं. इतका वे-
ळ आर्जव करीत होतों तें कोणीकडेसच गेलें. शाबा-
स पुष्पावती वहिनी तुह्मी अशा दोघी चौघी जर ए-
के ठिकाणीं झाला तर मग पुरुषाची फजितीच.

चं०— पुरें मेलं कांहीं तरी बोलावं. बरं प्राण-
नाथ आज इतक्या रात्रींपर्यंत कुठे कर्मणूक केली.
(हळूच) कां एखादी सवत गळ्यांत पडली आहे
तुमच्या मनांत हेच तर्क यावयाचे.

रू०---(थट्टेनें) बरें तुमचें काय गेलें. आह्मी हजारों सवती पाहिल्या ह्मणून तुमच्या विलासांत अंतर झालें नाहीं ह्मणजे झालें.

चं०— इश्शमेलं, पुरे, विनोदांत तरी कांहीं नीट बोलावं. आमचं काय जातय आणखी शेंकडों कां करा ना. लग्नाच्या असल्या तर बरंच झालं तितकं मला सुखच होईल. सगळ्याजणी मला मान देऊन माझं बहुतेक काम आटपतील. मला त्यांत संतोषच आहे. परंतु---

रू०— असें शहाणपणाचें भाषण आपल्या मुखांतून निघालें, हें आमचें भाग्यच समजावयाचें. तरी पण आहेच समजलों. आमच्या हातून वेश्या गमन कालांतरीही व्हावयाचें नाहीं. कारण, आह्मीच जर सदुपदेश करून दुसऱ्याला त्यापासून पराङमुख करवितों तर तसें आचरण करणें आह्मांला कसें शोभेल. मग आमच्या बोधाचें काय महत्व. त्यांत आणखी या सुंदर मूर्तीनें मन आकर्षण करून घेतल्यामुळें तें आतां दुसरीकडे जातय कोठें. या मुखेंदुला कधीं पाहीन आणि ह्या पीनपयोधर युगुलांना कधीं आलिंगीन असें मन अधिर होऊन जातें. या विलोल नेत्रा तरुणीला सोडून क्षणभरमुद्धां जाववत नाहीं. पण निरुपायास्तव जाणें भाग पडतें.

चं०— पुरे मला ठाऊकच आहे. एखाद्यास चढवायला लागलें ह्मणजे मग कुठं नेऊन ठेवतील याचा नियमच नाहीं नेहमींचाच स्वभाव पडला विनोदी.

एकदां वर्णन करायला लागले ह्मणजे मग अलंकार शास्त्रातलीं विशेषणं सुद्धां पुरावयाचीं नाहींत. मी सहज मेलं काय ह्मणाले आणि त्याची ही टिका किती.

रू०— हो तेंही सांगतों. आज आमच्या सरकारची जी चैन लागली ती कांहीं विलक्षणच. चला ह्मणाले बागेंत कारंजावरील शितल हवेंत घटकाभर विश्रांतीस जाऊं मग महाराजांची घटका ह्मणजे सहज दोन प्रहर रात्र झाली.

चं०— बरं प्रिया, आज तांबूल वगैरे कांहीं नको कां?

रू०— आणा. नको ह्मणून कसें चालतें. खरोखर सखे तुला अवलोकन केलें, आणि तुझी मधुर भाषणें ऐकलीं ह्मणजे संतोष होतो. असो आतां रात्र फारच झाली आहे तर नुसतां तांबूलच दे. अन्योपचार नकोत आतां निजूंदे. झोंप फार येतें.

चं०—प्राणनाथ हें काय! मग मी तें कशाला करून ठेवलं आहे. त्याला थोडा तरीं भान दिला पाहिजे.

रू०— प्राणेश्वरी तुझी विनंती अमान्य करावीशी वाटतच नाहीं. इतकी तूं दृढ मोहिनी घातली आहेस.

नंतर चंपकमालतीनें आंगास केशराची उटी लावून गळ्यांत हार घातले, हातांत गजरे दिले, उंची अत्तराचे फायेदेऊन मोठ्या प्रेमानें विडा मुखांत घातला. व कंठांत हात घालून आपण अगदीं शेजारीं बसली.

रू०— तुह्माला आज विडा खावयाचा नाहीं वाटतें.

चं०— (मुरकामारून लाजेनें) त्यांतलाच अर्धा.

रू॰— असें काय, बरें आहे, तर मग घ्या, नाहीं तरआणखी रुमाल, रागतर अगदीं नाकाच्या शेंड्यावरच बसला आहे कीं काय कोण जाणें.

तेव्हां चंपकमालतीनें मुखाजवळ मुख नेऊन विडा घेतला, एकमेकांनीं परस्परांचीं चुंबनें घेऊन अलिंगनें दिलीं व आनंदांत निद्रिस्त झालीं.

भाग दाहावा.

परमेश्वर कृपेनें कल्याण होऊं लागलें ह्मणजे मग कोणत्याप्रकारानें व केव्हां होईल याबद्दल आजमास सुद्धां करवत नाहीं. त्याप्रमाणेंच मदनराय राजाचें झालें आहे. पुष्पावती गरोदर राहिली. मग त्या आनंदास काय पहावयाचें आहे. राजवाड्यांत जिकडेतिकडे डोहोळे जेवणांची गर्दी उडून गेली आहे. राजास व राणीस आतां आपल्यासारखें सुखी या भूतलावर तर कोणी नसेल. कारण एकुलता एक पुत्र त्याचा लग्न सोहळा दृष्टीस पडून नातवंडाचें ही सुख पाहण्याचा सुप्रसंग जगदीश्वरानें आणला. तेव्हां आमच्या सारखे भाग्यवान कोण आहेत. अशा प्रकारें सर्व नगर आनंदमय असून चांदण्यारात्रीचें सरकारी डोहोळेजेवण बागेंत होतें. संपूर्ण नागरिक अंगना आपल्या योग्यतेनुरूप व सामर्थ्याप्रमाणें पुष्पावतीस देण्याकरितां दुकूलवस्त्रें, कंचुक्या, अलंकार

वगैरे घेऊन आल्या आहेत, दरबारांतील प्रमुख मंडळी तयारींत गुंतली आहे, भोजनाचा थाट चालला आहे, **मदनबाण** तर आतां आपल्या स्त्रियेच्या अर्ध्यावचनांत वागूं लागला आहे, तो ही मित्रासुद्धां बागेंत आला आहे, राजेसाहेब उल्हास अंतःकरणानें ती मौज पाहात आहेत, असो सकलजन समुह त्या सोहळ्यांत निमग्न आहे, ऐन दोन प्रहररात्रीचा समय झालेला आहे, शहरांत पहारेकरी व वृद्ध यां शिवाय कोणी नाहीं. अशा त्या मंगल वेळीं गुप्तहेर येऊन मोठ्यानें शंखनाद करितां झाला. तेव्हां पहारेकरी शिपायांनीं त्यास वीरबाहुसरदाराकडे नेलें. आणि त्याचा गुन्हा विदीत केला. तेव्हां वीरबाहु त्यास ह्मणाला, अरे आहे काय? अशा शुभ कार्यांत तूं अमंगल शब्द कसा केलास. तुझा आतां काय शासन करावें. तो घाबरला असल्या मुळें त्याचें सर्वांग कांपत होतें, व पळण्याच्या श्रमामुळें दम फार लागला असून श्वास कोंडल्या सारखें झालें होतें. त्या योगानें त्यास बोलवेना, तरी त्यानें अडखळत अडखळत सांगितलें कीं, मम महाराज परचक्र प्राप्त झालें आहे, दोन कोश एक सारखें लष्कर दिसलें, मग आणखी किती आहे, हें समजत नाहीं. आपली तयारी लौकर झाली तर बरें; नाहींतर आज आपली बरी गत दिसत नाहीं? हें ऐकतांच त्याची अवस्था काय झाली असेल तें सांगणेंच नको. तो ह्मणाला आतां काय करावें, सर्व जन समुदाय व कोमलांगी स्त्रिया ही बागेंत गेल्या आहेत, तसेंच बहुतेक सैन्य

हीं तिकडेच गेलें आहे. असो आतां दुःख विचारांत वेळ घालवून उपयोग नाहीं. युद्धाची तयारी करून फौज बाहेर तोंडावर नेली पाहिजे. असें ह्मणून त्यानें भयसूचक युद्धाचा नगारा ठोकविला. आणि लोक एके ठिकाणीं जमण्याचें वाद्य वाजविलें. मग काय लागलीच होते तेवढे सर्व लोक मोठ्याच धांदलीनें तयार होऊन बाहेर आले. त्या नगरांत एवढें मात्र फार चांगलें होतें कीं, आपल्या राजा करितां, नगरा करितां संपूर्ण जन आपला प्राण देण्यास तयार असत. याचें कारण राजाचें सद्वर्तन व प्रजेवर पुत्रवत प्रेम. त्या मुळें एखादे वेळेस वरील प्रमाणें प्रसंग आला असतां तात्काळ लोक जमा होऊन निकरानें लढत असत. नगरांत असलेली फौज बाहेर आल्यावर वीर बाहूनें अगोदर शत्रुस येण्याचे मार्गांचा बंदोबस्त केला. व आपण स्वतः सर्व सैन्यासुद्धां तयारीनें शत्रुच्या तोंडावर सामन्या करितां उभा राहिला. राजास बागेंत निरोप पाठविला कीं आपण सर्व मंडळी सुद्धां फारच त्वरीत नगरच्या दक्षिण मार्गानें नगरांत निघून यावें. एक पळभर सुद्धां आतां विलंब लावूं नये. दगा आहे. या प्रमाणें तो सरदार व्यवस्था लावतो आहे, तों हेरानें सांगितल्या प्रमाणें शत्रु येऊन पोहोंचला. शत्रु ज्या मतलबानें आला होता, ती मसलत फसली. त्यांचा मनोगत असा होता कीं, एकदम लोक असावध असतांना शहरावर छापा घालून विध्वंस करावयाचा. परंतु परमात्मा अनंत रूपीं परमेश्वर

सहाय्य असल्यावर दुष्टांचें कांहीं एक चालत नाहीं. त्यांचे हेतु मनचे मनांतच राहतात. याप्रमाणें इकडे कडेकोट तयारी असल्यामुळें लागलीच युद्धाचा प्रसंग आला. हें वर्तमान राजास कळतांच त्यानें तोफा सोडण्यास हुकूम दिला. दोन्हीकडील तोफखाना सुरू झाला. सैन्य हातघाईस आलें. त्यामुळें जी धूळ उडाली, व जो धूराचा लोट चालला, तेणेंकरून काळोख पडला, कोणास कोणी दिसेनासें झालें. मग तोफ भरावी आणि सोडावी. जो सांपडेल त्याची कत्तल उडवावी असा सपाटा चालला. तोफांचे आवाज कानीं पडतांच बागेंत राजे, राजपुत्र, प्रधान प्रधानपुत्र आदिकरून मंडळी घाबरून गेली, त्यांच्या तोंडचें पाणी पळालें, सर्वांची पांचावर धारण बसली, वदनें म्लान झालीं, शत्रुनें कशी वेळ साधिली, नगरांत कोणी नाहीं, शत्रु बहुतकरून आपण जाई तोंपर्यंत नगर घेतो, हा क्रूरसेन असावा, यांत संशय नाहीं. त्याशिवाय आपणांस कोणी शत्रु दिसत नाहीं. असो, परब्रह्म सनातन सर्व साक्षी सच्चिदानंद जें करील तें खरें. असें ह्मणून मदनबाण व रूपसुंदर घोड्यावर स्वार झाले. त्यांनीं प्रधानजीस सांगितलें कीं, आह्मीं नगरांत जाऊन काय तजवीज केली ती पाहतों. तुह्मीं लौकर स्त्रीमंडळ घेऊन नगरांत यावें. सर्वांत त्यांना फार संभाळलें पाहिजे. शत्रुचा सर्व रोंख त्यांजवर आहे. असें सांगून अर्धें सैन्य त्यांच्या

संरक्षणाकरितां ठेऊन बाकीचें बरोबर घेऊन नगराकडे निघाले. नगरांत येऊन पाहतात तों वीरबाहु सरदारानें शत्रुस सामना दिला असून शत्रुचा मोड करण्याचा समय आणला आहे, परंतु शत्रुचें मागें राहिलेलें लष्कर येऊन त्यास मिळाल्यामुळें मात्र त्याचा उपाय चालत नाहीं असें पाहिलें. शत्रुकडील लोकांनीं काय लबाडी केली कीं, कांहीं सैन्य एका सरदाराच्या ताब्यांत देऊन त्यास आडमार्गानें बागेवर पाठविलें. त्यांची आणि प्रतापसिंह प्रधानजीची मागांत गांठ पडली. लागलीच युद्ध जुंपलें. खुद्द प्रतापसिंह त्यांत असल्यामुळें तो शत्रुस दाद देतो. त्यानें शत्रुबरोबर मोठ्या पराक्रमानें व निकरानें समर करून त्यास पळवून लाविलें. त्या संग्रामांत त्या अबलाच जेव्हां ती युद्धाची धांदल उडाली व तरवारी चमकूं लागल्या तेव्हां त्या सैरावैरा जिकडे मार्ग मिळेल तिकडे पळत सुटल्या. कांहीं नगराकडे गेल्या, कांहीं डोंगरांत पळाल्या, कांहीं दरींत लपून बसल्या, अशी अवस्था झाली. प्रधान त्यांचा पाठलाग करींत करीत आपल्या लोकांस येऊन मिळाला. आणि एका सरदारास सर्व स्त्रिया आपापल्या घरीं पोहोंचल्या किंवा नाहीं याच्या चौकशी करितां पाठविले. इकडे शत्रुचें सैन्य फार असल्यामुळें व ते लोक जीवाची पर्वा न बाळगितां लढत असल्यानें अगदीं हातघाई सुरू होऊन **मदनराय** राजाचे लोक अगदीं मागें हटण्याचा सुमार आला आहे. **मदनबाण** व **रूप**-

सुंदर आपल्या सैन्यास धीर देत आहेत. ते मोठ्या वीरश्रीनें ह्मणाले, संपूर्ण सैनिकांनीं थोडा वेळ असेंच नेट धरून निकरानें लढावें शत्रु ह्मणजे पदार्थ काय आहे, आतां पळवून लावूं. असे ह्मणून उभयतां हीं घोडे पुढें घालून सर्वत्रांस धीर देत चालले आहेत. तों प्रधान व त्यांचें सैन्य येऊन पोहोंचलें. हें वर सांगितलेंच आहे. मग त्यांस जो धीर आला. तो कांहीं विलक्षणच लागलीच " हर हर महादेव " करीत जे लोक उसळले ते प्राणाची आशा न करितां मोठ्या शर्तीनें शत्रूवर तुटून पडले. असें तें पहाटपर्यंत भयंकर रणकंदन चाललें होतें. त्या वेळेस जो कहर गुदरला तो वर्णन करवत नाहीं. मुळींच तें मृत्युस्थान हातावर शीर घेऊन जावें लागतें. अस्थिमांसाचा चिखल झाला असून शोणिताची नदी वाहूं लागली आहे. त्यांत कित्येक यमपुरीस गेले आहेत, कित्येक तो मार्ग स्वीकारण्याच्या तयारींत आहेत, कित्येकांचे हात मोडले आहेत, कोणांचे पाय, कोणाचे डोळे फुटले आहेत, कोणी शरीर छिन्नभिन्न होऊन पडले आहेत, कोणी कण्हत पडले आहेत, असें तें रण भयाण दिसत आहे. तों शत्रु मागें हटल्याची बातमी येऊन पोहोंचली. तेव्हां तर मदनरायाच्या वीरांस दसपट बळ आलें. ते रात्रभर युद्ध करून अगदीं थकून गेले होते तरी ईर्षेनें त्या घाबरलेल्या व पळत असलेल्या शत्रुसैन्याच्या मागें लागले. परंतु शत्रुचे लोक एकेक होऊन नि-

रनिराळ्या मार्गानें पळूं लागले, त्यामुळें त्यांस धरण्याचा फार त्रास होऊं लागला. तेव्हां **मदनबाण** व **रूपसुंदर** आपल्या सैन्यास म्हणाले, शत्रु कोठें जातो आहे. आपण थोडीशी विश्रांति घेऊन फळाहार करूं. आणि मग दुष्टाचें निर्मूलन करून टाकूं. असें सांगून जेवढे सांपडले होते त्यांस तुरुंगांत पाठवून सर्व उपहारा करितां निघून गेले. हें त्या चांडाळ **क्रूरसेनाचें**च कृत्य असें जेव्हां त्यांना कळलें, तेव्हां तर सर्व सैन्य दांतओंठ खाऊं लागले. व ह्मणालें असल्या दुरात्म्याचा पूर्ण नाश करून त्यास धरून आणून जन्मठेपेंत ठेवावयाचा, तेव्हांच हातांतील शस्त्रें खालीं ठेवावयाचीं.

याप्रमाणें निश्चय होऊन सैन्याची सिद्धता झाल्यावर **क्रूरसेनाच्या** नाशास्तव तमाळ देशाकडे त्यांनीं कुच केलें. इकडे **अनंगपूरास** व **भद्रपुरीं** हें वर्तमान कळतांच ते राजे आपापलीं सैन्यें घेऊन निघाले. त्यांस माहीतच होतें कीं, हा **क्रूरसेन** स्वभावानें कपटी महात्वाकांक्षी व दुष्ट तर पहिल्या प्रतीचा आहे. हा कोणत्या वेळेस घात करील याचा नियम नाहीं ह्मणून ते नेहमीं तयारींतच असत. त्यांची व **मदनराय** राजाच्या सैन्याची मार्गांत गांठ पडली. त्यायोगें सर्वत्रांस बहुत आल्हाद झाला. ही सागराकार सेना अवलोकन करतांच **क्रूरसेनाच्या** पळत असलेल्या लोकांचें धाबें दणाणलें. त्यांना पळतां भूई थोडी झाली. मग काय धर, पकड, कैद

कर, कत्तलकर, (परंतु असा प्रसंग बहुतकरून फारसा आणीत नसत नच ऐकेल व त्रासच देईल तर स्वारीचा उपयोग करीत असत) याप्रमाणें भयंकर अनर्थ करीत क्रूरसेनाच्या नगरा समोर जाऊन मोरचे दिले. तेथें थोडीशी फौज शहराच्या रक्षणाकरितां ठेवलेली होती. त्यांनीं लागलेंच नगर स्वाधीन केलें मग खजिना लुटून गरिबास व शिपायांस वांटून टाकला. आणि तेथील प्रधानाच्या पुत्रास गादीवर बसवून आपला मांडलिक केला व दरसाल करभार देण्याचें ठरवून मोठ्या हर्षानें क्रीडावतीस येण्यास निघाले. बहुत युक्तीनें, चातुर्यानें व गुप्तपणें क्रूरसेनाचा तपास केला परंतु त्याचा व प्रधानाचा शोध लागला नाहीं ते कोणीकडे पळून गेले असतील ते असोत. असें विजयी होऊन सर्व सैन्य आल्यावर राजानें त्याचा सत्कार करून त्यांस मोठ मोठालीं बक्षिसें दिलीं. व सर्वोत्कृष्ट दीपोत्साह चालविला.

भाग अकरावा.

दुसरें दिवशीं परचक्राचा मोड करून उपहारानंतर तें सैन्य क्रूरसेनाच्या नाशास्तव मार्गस्थ झालें असतां इकडे संपूर्ण जन समाज, स्त्रिया आपापल्या परी शोक करीत असून राजवाड्यांत हाहाःकार झाला आहे. कारण ज्या वेळेस ती धांदल उडाली

त्यांत वृद्ध वगैरे किती एक स्त्रिया त्या दिवशीं व दु-
सरे दिवशीं गृहाप्रत आल्या. परंतु पुष्कळ स्त्रियां-
चा ठिकाण नसून कोणाची आवडती कन्या नाहीं,
कोणाची नात नाहीं, कोणाची सून नाहीं, त्यामुळें
सर्व नगर आक्रोश करीत आहे. बुद्द जिच्या क-
रितां हा विस्तीर्ण समारंभ **चंद्रिकेंत** चालविला होता;
व जी आतां सर्वांच्या तळहस्ताच्या फोडासारखी प्रि-
य झालेली **पुष्पावती** तीच नाहीं. या सोहळ्यास
तिची माता **विलासरंभा** आलेली असल्यामुळें तिनें व
मदनबाणाच्या शांतिकला मातोश्रीनें तर अकांत
करून सोडला. ही बातमी राजास कळतांच त्यानें
राहिलेले लोक स्त्रियांच्या शोधास पाठविले. त्यांनीं
जितक्या सांपडतील तितक्या राजवाड्यांत आणून पो-
होंचविल्या. परंतु **पुष्पावती**चा थांग नाहीं. असें पाहून
सेवक लोक थकले. त्यामुळें सर्व चिंताग्रस्त झालें
आहेत. तो विजयी होऊन आलेल्या शूरांसही दुर्वार्ता
कळतांच त्यांस मनस्वी दुःख झालें. कोणासही कांहीं
सुचेना. तिच्या आईनें शोकानें राजवाडा दणाणून
टाकला. ती ह्मणूं लागली माझ्या बाळेवरच कशीं
नेहमीं संकटें येतात. आतां तर ती सात महिन्या-
ची गरोदर तिच्यानें चालवत नाहीं कीं खाववत नाहीं
आतां तिची काय दशा होईल ? माझी लाडकी फि-
रून माझ्या दृष्टीस कधीं पडेल ? अशी शोकानें वि-
व्हळ होत आहे. इतर स्त्रिया तिची समजूत करीत
आहेत. असा कहर चालला आहे.

मदनबाणाचें शांतवन करण्याकरितां रूपसुंदर नेहमीं त्यांचे जवळ असे. त्याचें अनेक प्रकारें तो समाधान करी.

म०—मित्रा, आतां कोठें सुख अनुभवण्यास लागलों होतों; तोंच कसारे परमेश्वरानें घाला घातला. माझी प्रिया कोठें असेल ! तिजला खाण्यापिण्यास मिळत आहे किंवा नाहीं ! कां त्या दुष्टाच्या स्वाधीन झाली आहे ! त्या पाषाणाचा ज्या अर्थीं तपास नाहीं तेव्हां तो माझ्या सुंदरीला घेऊन पळून तर गेला नसेलना ! त्या चांडाळाच्या हस्तगत झाल्यास सखीचें पुन्हादर्शन होणें दुर्लभ ! मग ती काळाच्या दाढेंतच गेली ! काय असेल तें कळत नाहीं. काय सांगूं रूपसुंदरा, तिच्या सारखी स्त्री जन्म जन्मांतरी तपश्चर्या केली तरी प्राप्त होणार नाहीं. तिच्या एकेका गुणाचें व विलासाचें स्मरण झालें ह्मणजे काळीज दुभंग होतें. अरे जिला गृहांमध्यें चालतांना कष्ट व्हावें, जिला गर्भभार सोसवत नसे तिची वनांत काय अवस्था झाली असेल ! श्रीरामचंद्रजीच्या ह्मणण्याप्रमाणेंच माझी स्थिती झाली आहे. काय करूं मित्रा, मला आतां तिचा वियोग सहन होत नाहीं ! प्राणेश्वरी जर मला भेटणार नाहीं, तर माझाही प्राण वांचणार नाहीं. सख्या तूं आमचा मंत्रीक आहेस, तुझ्या योगानें आमचे इष्ट हेतु सिद्धच होत गेले आहेत. तुझ्या निस्सिम मित्रभक्तीचा व अश्रांत श्रमाचा माझ्यानें उच्चार सुद्धां करवत नाहीं. सांप्रत-

चें यश तुला भगवंतानें द्यावें. तर तूं त्या दीनवत्सल जगदोद्धाराचें नांव घेऊन चालता हो. खचित प्रभो तुला यश देईल.

रू०—मी आपल्या आज्ञेचें उल्लंघन करीत नाहीं. परंतु मी गेल्यावर आपण जर असा अहर्निश विलाप करीत बसाल, तर मग आपलें काय होईल, हें मला सांगवत नाहीं ! एवढ्या करितां मी आपणांस सोडून जाण्यास अनमान करितों.

प्र०— तुझ्याच गळ्याची शपथ मी आतां अगदीं शोक करणार नाहीं, तूं माझी काळजी न करितां बिनदिक्कत जा.

तेव्हां रूपसुंदरानें पुष्कळ प्रकारानें त्यास बोधाच्या गोष्टी सांगून आपण सैन्यासह पुष्पावतीच्या शोधास निघून गेला.

इकडे पुष्पावती त्या गर्दींत आपला जीव घेऊन पळूं लागली. जिच्या कधीं बाहेरचें ऊन दृष्टीस पडावयाचें नाहीं, जिला मंदिरांत मऊ बिछायतीवर चालतांना दुःख व्हांवें, जिच्या सेवेला शेंकडों दाशी अगदीं तत्पर. तिला दैवगतीनें काय प्रसंग आला आहे? त्या कंटक मय रानांत पाषाणांतून अडमार्गानें चालण्याची तिला कां संवय आहे? तिच्या सुकुमार पायांस झाडांचीं खुसपटें, कांटें, व सराटे लागल्यानें तिचीं नाजुक पाउलें रक्तमय झालीं आहेत. नेसलेलें लुगडें व आंगावरची शाल हीं कांटेरीझाडांना अडकून फाटल्यामुळें त्या कोमल शरीरास ही इजा

झाली आहे, सात महिन्यांचें ओझें पुढें, त्या योगानें तर तिला पाऊल सुद्धां टाकवत नाहीं, बरें कोठें विसांव्यास बसावें तर मागून कोणी येऊन त्रास देईल ही भीति. यामुळें ती मोठ्या कष्टानें तशीच चालत असतां एक्या खुसपटांत पाय अडकून त्या पाषाण शय्येवर धाडकन आपटली. त्यायोगें तिचें सर्वांग ठेंचलें व तिला मूर्छना आली. त्या समयास क्रूरसेनाक डील कोणी घोडेस्वार आपला जीव घेऊन पळत होता. त्यानें तिजला पाहिलें. ही पुष्पावती असावी असें जाणून तो तिजला घोड्यावर घेऊन पळूं लागला. कारण जर इला आपल्या सरकारास नेऊन भेटविलें तर मग आपणांस काय कमी आहे. आपलें दैव खचित उदयास आलें ह्मणूनच हा लाभ झाला असो आतां गुप्त रीतीनें ही ईश्वर दत्त देणगी युक्तीनें व मोठ्या कौशल्यानें संभाळून बेतानें नेली पाहिजे. कोणास कळतां उपयोगीं नाहीं. इच्या करितां शेंकडों राजे व खुद्द आमचे सरकार राज्यसुखास अंतरले आहेत. तेव्हां अशा सुंदरीचा तपास तो मदनबाण फार त्वरित जारीनें करील याजकरितां इजला दिवसाचें घेऊन जाणें फार कठीण आहे तर रात्रींच मार्ग क्रमिला पाहिजे. असें ह्मणून चालूं लागला. परंतु प्रतापसिंह प्रधानजींचे लोक मोठ्या शौर्यानें शीर हातावर घेऊन लढत असल्यामुळें त्या सपाट्यांतून त्याचें आणण्याचें धैर्य होईना तेव्हां युद्धाची अंमळ शांतता होऊन सैन्य नगराकडे गेल्यावर जावें तोंपर्यंत येथें कोठें जंग-

ळांत दडून बसावें, असा विचार करून तो एकांत जागा शोधूं लागला. तेव्हां तेथून जवळच सुमारें दोन कोशावर निबिड अरण्यांत डोंगरांत एक गुहा त्याच्या दृष्टीस पडली. मग लागलाच त्या गुहेंत जाऊन घोड्यास बांधून पुष्पावतीस एका फाटक्या धोतरावर निजविलें. आणि आपण हातांत तरवार घेऊन गुहेच्या दरवाजाशीं बसला. कांहीं वेळानें पुष्पावती सावध झाली. व कण्हत विवळत ह्मणूं लागली, हरहर हे शंकरा काय हा प्रसंग! देवा, माझंच नशिब असं फुटकं कसं! मला ह्मणून सुख मिळूंच नये, असा ईश्वरी नियम आहे कीं काय? प्रभो नुकतं कुठं सुखांत काळ घालवूं लागल्यें होत्यें, तों कसं त्या चांडाळानं संधी साधून हा मजवर घाला घातला. देवा, पूर्वजन्मीं मी असं कोणतं महत्पातक केलं आहे, ह्मणून या जन्मीं मला सुख लागूं नये. आतां या घोरवनांत मीं काय करावं माझ्यानें पाऊल सुद्धां उचलवत नाहीं. सर्वांग ठणकत आहे, घसा कोरडा पडला. माझी ही अवस्था प्रियाला कशी कळणार? मला तर आतां जाग्यावरून हालवत नाहीं. तिकडं त्या नरपशूनं नगरांत काय केलं आहे. प्राणनाथ मोठ्या विरिश्रीनं व त्वेषानं गेले आहेत, तेव्हां ते खुशाल असोत ह्मणजे झालं. या भयंकर ठिकाणांत मीं कितीही आक्रोश केला, तरी त्याचा काय उपयोग! एक त्या करुणाकर दयानिधि भगवंतालाच काय दया येईल ती खरी. देवा असा काल मला आ-

णखी किती घालवयाचा आहे ! मलाच कसं भोक्तृत्व भोगावयास लागतं आहे ! असो, थोडंसं दिसूं लागलं ह्मणजे जसं चालवलं तसं चालूं लागावं. ह्मणजे कोणी भेटल्यास नगराकडील वर्तमानही कळलं. व आपली ही तजवीज लागलं. थोडेंसें दिसूं लागल्यावर जों पहाते तों आपण एका गुहेंत असोन धोतरावर निजलेली आहे. तेव्हां तिला मोठें आश्चर्य वाटलें. ती ह्मणाली एक परमेश्वराची कृपा किंवा राक्षस पिशाच अथवा कोणी तरी मनुष्य, याशिवाय मी या स्थळीं आल्यें नाहीं. ईश्वरी लीला अगाध आहे. असें ह्मणून प्रकाशाच्या धोरणानें मार्ग शोधूं लागली तों गुहेच्या द्वारांशीं हातांत तरवार घेऊन बसलेला गृहस्थ तिच्या दृष्टीस पडला. त्यास पहातांच पुष्पावतीस आश्चर्यानंद आणि दुःखही एकदम झालीं. या अशा भयंकर निर्जन स्थळीं मनुष्य पहारा करीत आहे यावरून हा आपलाच कोणी असावा, ह्मणून नवल, व त्यास मी सांपडलें हा देवाचा मजवर केवढा प्रसाद, म्हणून संतोष, आणि खरा प्रकार असाच आहे कां कांहीं विपरीत आहे, म्हणून दुःख, याप्रमाणें ती मनांत मोठ्याच विंवचनेंत असतां, तो गृहस्थ जवळ येऊन ह्मणाला, महाराज आपण स्वस्थ असावें; नगराकडून आपल्यास नेण्याकरितां पालखी आल्यावर लौकरच शहरांत जाऊं. आपणास येथें ठेविलें असोन मला रक्षण करण्यास सांगितलें आहे. हे शब्द ऐकतांच तर पुष्पावतीस अत्यानंद झाला, व ती पर-

मेश्वराची फार फार उपकारी झाली. परंतु हा हर्ष फार वेळ टिकला नाहीं: संध्याकाळच्या सुमारास सर्व तिला विपरीत दिसलें. कारण जासुदाचा ठिकाण नाहीं. या शिवाय दुसरें कोणीही माणूस आलें नाहीं. व हा गृहस्थही पाहण्यांतळा नाहीं. तेव्हां ती त्यास म्हणाली, महाराज आपण कोण आहांत, अपणांस येथें कोणीं पाठविलं, व नगराकडील वर्तमान काय आहे तें सांगावं; त्याखेरीज माझा जीव सुचीत होणार नाहीं. तो गृहस्थ कांहींच बोलला नाहीं. कांहीं वेळानें फक्त एवढेंच म्हणाला, स्वस्थ मुकाट्यानें बसा फार बोलूं नका हीं त्याच्या मुखांतून दरडावणीची भाषणें निवतांच पुष्पावतीचा धीर खचला. व कांहीं तरी दगा आहे असें तिला वाटलें. तो पुरुष तिजला काळासारखा दिसूं लागला ती मनांत विचार करूं लागली कीं, या चांडाळापासून आपली मुक्तता कशी होईल ? मी या स्थळीं असल्याची बातमी बाहेर कशी लागेल. भावोजीस तरी हें गुप्त ठिकाण कसं कळल असो जें जें होणें असेल तें खरं परमेश्वरा तूं दिनाचा दयाळू अनाथाचानाथ असें असून माझी दया तुला कशी येत नाहीं. तुला तरी दोष देऊन काय उपयोग! माझ्या कपाळीं जसं सटविनं लिहिलं असल तें चुकतं आहे.

त्या गृहस्थास मोठ्या काकलुतीनें म्हणाली; महाराज, आपण मला पित्यासारखे आहांत, आपण साक्षात् शंकरच प्रगट होऊन मला वांचविण्याकरितां

आले असावेत असं वाटतं. तर महाराज मजगरी-ब कन्येवर दया करा. आणि नगराकडील खरं वर्तमान काय असल तें मला सांगा. मी तुह्मांला साष्टांगनमस्कार घालतें (त्याप्रमाणें करते) मला या अशा भयंकर स्थळीं कशाकरितां आणलं; व आतां नगराकडे केव्हां नेणार, अशा अनेक प्रकारांनीं तिनें त्याची विनवणी केली, पण त्यानें एक अक्षरसुद्धां मुखांतून काढलें नाहीं. मग तशीच दुःखांत ती रात्र घालविली. तेव्हां आतां तरी आपणांस नगरांत नेण्याकरितां कोणीं येईल, ह्मणून वाट पहात आहे, परंतु तिची सर्व आशा निर्फळ झाली. तेव्हां मात्र तिची बालंबाल खात्री झाली कीं, हा कोणी तरी शत्रूकडील अतिनीच मनुष्य असावा. याच्या मनांत आपणांस नेऊन त्या मांगाच्या स्वाधीन करावयाचें आहे; असें दिसतें. अतिनम्रतेनें पायापडून ती त्यास ह्मणाली, महाराज मला आपण नगरांत नेऊन पोहोंचवावें. मी आपल्या प्राणनाथांना सांगून आपली योग्यता वाढवीन, इनाम करवून देईन, आपले उपकार देहांत जीवांतजीव आहे तों विसरणार नाहीं. महाराज, आपल्याला माझें भाषण खरं वाटत नसल्यास सध्यां बक्षिसादाखल हे माझे सगळे दागिने घ्या. आणि नगरांत गेल्यावर मवां सांगितल्याप्रमाणें तुमचे सर्व मनोरथ पूर्ण करीन, पुष्पावतीनें आपल्याकडून त्याची पाहिजे तितकी विनवणी केली; जीवदानाचें

'वचन दिलें. परंतु व्यर्थ. त्या दुष्टास तिची करुणा कसची येते. पुष्पावती जेव्हां फारच बोलूं लागली व मोठ्यानें शोक करूं लागली; तेव्हां त्या चांडाळानें तिच्या तोंडांत बोळा घालून तिजला आंवळून टाकलें. मग त्या हतभाग्य पुष्पावतीस असें झालें कीं, अशा हालापेक्षां एकदम मृत्यु आलेला बरा!!! परंतु उपयोग काय मरण येणें ही तिच्या स्वाधीनची गोष्ट नव्हती.

त्या गृहस्थाच्या मनोरथाप्रमाणें प्रसंगच येईना. कारण पुष्पावती नाहींशी झाली, असें समजल्यापासून त्या अरण्यांत जिकडे तिकडे तिजला शोधण्या करितां रात्रंदिवस लोक फिरत होते. त्यामुळें त्याला पुष्पावतीस घेऊन जातां येईना. पुष्पावती इतकी त्रासली ती एकेदिवशीं त्यास ह्मणाली, मला कोणीकडे न्यावयाचं तुझ्या मनांत आहे. तिकडं तरी ने. नाहीं तर तुझ्या हस्तांतील शस्त्रानं दोन तुकडे तरी कर, ह्मणजे सुटल्यें. परंतु हें दुःख मला आतां सोसवत नाहीं. अशी ती दररोज सकाळ संध्याकाळ ज्याप्रमाणें देवपूजा करावी, तशी त्याची प्रार्थना करीत असे. परंतु त्या मांगहृदयीं दुष्टाला तिची दया आली नाहीं.

भाग बारावा.

सकल ब्रह्मांडाचा नायक जो परमात्मा ईश्वर त्याचा कोपानल प्रज्वलीत झाला असतां, मानवश्रमरूपी आहुती दग्ध कां होणार नाहींत. सांप्रतकाळीं मदनराय राजास अनिष्टकाळ आला आहे. स्नुषा नाहींशी झाल्यामुळें एकुलता एक पुत्र मदनबाण तिच्या ध्यासानें सर्व संग परित्याग करून दुःखांत दिवस घालवितो आहे. लोक तपास करून दमले परंतु कांहीं सुगावा लागला नाहीं. त्यामुळें नागरिक तशीच तिची माता विलासरंभा व मदनबाणाची आई शांतिकला ह्या निराश झाल्या आहेत. एवढा रूपसुंदर पराक्रमी व शोधण्याच्या कामांत ज्याचा हात खंडा; परंतु तो सुद्धां या खेपेस हतविर्य झाला. तो आपणाशींच ह्मणूं लागला वहिनीला बाहेर पडण्याला कोणवेळ लागली असेल ती असो. या कृष्णवदनानें मदनबाणास सांपडत नाहीं असें सांगण्यापेक्षां मृत्यु पावावें, हें बरें.

दास वगैरे जवळचे जे कांहीं हुशार लोक बरोबर होते, ते ह्मणाले महाराज, हें काय, असें आपण स्त्रियेसारखे शोकाकूल झाल्यावर आह्मीं व त्यांच्या घरच्या मातांनीं काय करावें. आपण चिंता करूं नका सुदैवानें लौकरच तपास लागेल. अशा प्रकारें दुःखानें अरण्यांत फिरत आहेत.

शिवोपासकांची गर्दी उडून गेली आहे. कारण तेथून जवळच पांच कोशांवर मोक्षतीर्थ ह्मणून एक पवित्र स्थान होतें. तेथें शिवालय असून कोणतें ही पर्व आलें असतां यात्रा भरत असे. व श्रीशंकराचा उत्सव होत असे. या वेळेस सर्व पर्वण्यांत आदिस्थान पावलेलें गज्यच्छाया पर्व आलें असल्यामुळें नगरवाशी जन मोक्षतीर्थीं यंदां उत्सव होतो किंवा नाहीं; याजबद्दल विचार करूं लागले. तेव्हां कांहीं लोकांनीं कल्पना काढिली कीं, राज घराण्यांतील मनुष्यें दुःखानें होरपळून गेलीं आहेत. तेव्हां यंदा उत्सव होईलसा दिसत नाहीं, कारण कोणास ही उल्हास नाहीं, सर्वदुःखी आहेत, तरी पण दैविककृत्य राहावयाचें नाहीं. सरकार व दरबारांतील श्रेष्ठ लोकांवाचून आपणांस तरी काय फायदा होणार आहे. आतां असें करावें प्रधानजींच्या कानावर ही गोष्ट घालून सरकारचें मत काय आहे तें पहावें.

वरीलप्रमाणें विचार करून प्रधानास सर्व मजकूर विदीत केला. त्यानें राजास विनंती केली कीं, मोक्षतीर्थावर यंदा जावयाचें किंवा नाहीं. उत्सव तर राहावयाचाच नाहीं; परंतु सरकारची परवानगी जशी होईल तशी व्यवस्था लावण्यास ठीक पडेल. तेव्हां राजानें सांगितलें कीं, वहिवाटीप्रमाणें सर्व करा. आणि स्त्रियांना त्यांच्या दुःखाचा विसर पडण्या कारितां त्या आल्यास त्यांना घेऊन जा. नंतर प्रधानानें राणी सरकारास सदरील हकीकत बहुत दुःखानें कळविली.

त्यावर उत्तर देतां विहिणी म्हणाल्या वाड्यांत बसून हीं चैन पडत नाहीं, तस्मात मुक्ततीर्थीं जावें तेवढाच एक दिवस पुण्य कर्मांत जाईल. तेथें अनेक ठिकाणचे लोक येतील, तेणें करून माझ्या बयेची कांहीं सुवार्ता लागल्यास प्रारब्ध.

वि. प्रादिजनसमुदायास त्याचप्रमाणें कामगार लोकांस अनुक्रमें उत्सवपत्रें व सक्त हुकूम देऊन तीर्थावर पाठविलें. चालीप्रमाणें उत्सव सुरू झाला. प्रधानजींनीं व्यवस्था व बंदोबस्त उत्तम प्रकारें ठेविला होता दुसरे दिवशीं आपापल्यापरी संपूर्ण पुरुष व स्त्रिया " समानशीलें व्यसनेषु सख्यं " या न्यायानें मिळून चालले आहेत. खुद्द सरकार व युवराज मदनबाण हे कांहीं गेले नाहींत. स्त्रिया आपापल्या वयाच्या पाहून गोष्टी बोलत चालल्या आहेत. चंपकमालती व त्या दोघींच्या आणखी तीघी मैत्रिणी ह्याही या मेळ्यांत गेल्या होत्या. तीर्थावर गेल्या नंतर स्नानें झाल्यावर राण्यांनीं मनस्वी दानधर्म केला. कोणास पैठण्या, कोणास शालू, कोणास जरीकाठी लुगडीं, कोणास भरजरी चोळ्या, त्याचप्रमाणें पितांबर, शालजोड्या, धोतरजोडे दक्षिणा हीं अगणित दिलीं. व ब्राह्मण संतर्पण करून गरीबगुरीब आदिकरून संपूर्णांस भोजन घालविलें, कोणत्याही ज्ञातीस अन्न मिळालें नाहीं असें ठेवलें नाहीं. याप्रमाणें उक्त असा दानधर्म करून सायंकाळीं सकल जन समूह नगरांत येण्यास निघाला.

देवदर्शन घेऊन चंपकमालती आदिकरून गडणी व त्यांचें बरोबरचे सेवकवृंद हे मागून वनश्री अवलोकीत व विचित्र पुष्पें फळें तोडीत पायांनींच येत आहेत. याच जंगलांत रूपसुंदर असल्याचें सेवकांनीं त्यांस सांगितलें होतें. तेव्हां चंपकमालतीचा हेतु कीं मार्गांत फिरतांना कदाचित भेट झाल्यास मुखेंदु दृग्गोचर होईल, व बाईसाहेबांचेंही कांहीं वर्तमान कळेल. अशा अर्थानें त्या हौसनें अडमार्गानेंच चालल्या होत्या. त्या बऱ्याच दूर गेल्यावर आपापणांत ह्मणूं लागल्या कीं, आजच्या समयास जर आपल्या पुष्पावती बाईसाहेब असत्या, तर काय बहार झाली असती. परंतु काय आंबाबाईचा कोप झाला आहे, तें कळत नाहीं. संध्याकाळ होऊन रानांत बरेंच सामसूम झालें आहे, यांचें बरोबर सेवक शिबंदी वगैरे मंडळी पुष्कळ होती हें सांगावयास नकोच. जिकडे तिकडे किर्रर असा शब्द होत आहे, तों वायूच्या वाहण्यावर कोणी तरी रडतें आहे, असा शब्द यांच्या कर्णीं आला. तेव्हां सगळें स्तब्ध राहून कानोसा घेऊन ऐकूं लागलें. तों खरोखरच कोणी स्त्री रुदन करीत असावी; असें वाटलें. ज्याप्रमाणें एखाद्या स्त्रियेला तिचा भ्रतार ताडण करीत असतां ती आक्रोश करीत असतें; तसा प्रकार आहे; असा तर्क निःसंशय झाला. पण अशा भयंकर वनांत स्त्रिपुरुषांचें येण्याचें कारण काय ! व हीं मनुष्यें कोणत्या स्थळीं असावी; हें कांहींच कळेना. तेव्हां चंपकमालती ह्मणाली, जर या-

वेळेस प्राणनाथ असते, तर त्यांनीं हा काय चमत्कार आहे; याचा तपास लाविला असता, इतक्यांत एक स्वार ह्मणाला, रूपसुंदर महाराज जवळच आहेत. आतां बोलावून आणतो. असें ह्मणून लागलाच घोडा भरधांव काढून रूपसुंदरास त्यांचे बरोबरीचे मंडळीसुद्धां तेथें घेऊन आला. तेव्हां सेवकांनीं ती सर्व हकीकत सांगितली, ती श्रवण करून त्यास मनस्वी विस्मय वाटला. असल्या गुप्त कृत्याचा शोध अवश्य व अगत्य केला पाहिजे. मग मशाली बुड्या पेटवून रुदनाच्या स्वरावर शेंपन्नास लोकांसहीत रूपसुंदर स्त्रियांचा चांगला बंदोबस्त करून शोध करीत चालला. तों उजेड त्या गुहेंत पडल्यामुळें पुष्पावती मोठ्यानें धांवा, याहो लौकर, यांतून मला सोडवा; असें ओरडूं लागली. असें पुष्पावतीचें कृत्य पाहून त्या चांडाळास जो संताप आला, त्या आवेशांत त्यानें तिला पुष्कळ लत्ताप्रहार करून मागीलप्रमाणें मुखांत मलिनवस्त्राचा बोळा घालून बांधून टाकिलें. त्यास वाटलें कीं आतां आपलें हें गुप्त कृत्य उघडकीस आल्या शिवाय राहत नाहीं. असो ईश्वर जें करील तें खरें.

शब्द श्रवणीं पडतांच रूपसुंदरादी सर्वत्रांची खात्री झाली कीं स्त्रीच आहे. परंतु स्थळ दृष्टीस पडत नाहीं. तरी एवढें खरें कीं, याच डोंगरांत कोठें तरी जवळच असली पाहिजे. त्या शिवाय इतका स्पष्ट शब्द ऐकूं येणार नाहीं. सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन करीत चालले आहेत तों डोंगराला आडबाजूला एक कोनाड्या

सारखें भोंक असून त्यांत एका मनुष्याला उचलेल, एवढा धोंडा बसविलेला आहे, असें दिसलें. परंतु पूर्वीं जे शब्द ऐकूं आले,तें आतां कांहीं ऐकूं येत नाहीं.त व त्या स्थळीं मनुष्याची चाहूलही नाहीं. तरी रूपसुंदरानें धोंडा काढून आंत काय आहे, तें पाहण्याविषयीं सेवकास आज्ञा केली. तेव्हां सेवकांनीं धोंडा काढून जवळ मशाल नेऊन आंत डोंकावून जों पाहिलें, तों भुयारासारखें लांबचलांब असें त्यांच्या दृष्टीस पडलें. तें त्यांनीं सर्वांस सांगितलें. तेव्हां रूपसुंदर ह्मणाला दोघे चौघे आंत उजेड नेऊन काय तें पाहून या. प्रथम कोणाची ही आंत जाण्याची छाती होईना.

मुख न दाखवितां आंत असलेला गृहस्थ बाहेरच्यांनीं डोंकावून पाहिलें असतां नागवी तलवार दाखवी. तेणेंकरून पाहणारे भिऊन मागें सरत. आंत कोणी तरी असावें हें अनुमान खरें झालें. परंतु राक्षस आहे किंवा भूतचेष्टा आहे, याचा कांहीं उमज पडेना. त्यामुळें ते शूर शिपाई असून आंत जाण्यास भिऊं लागले. रूपसुंदर ह्मणाला अद्याप तुमचा भोळा स्वभाव व मूर्खपणा जागृत आहेच. अहो रुदन करणारी स्त्रि असा सिद्धान्त जर ठरला तर चेष्टा किंवा राक्षस कसचा आला आहे. कलियुगांत त्या सर्व कल्पना नाहींशा झाल्या आहेत. कोणी तरी दुष्ट तस्कर असावा दुसरें कांहीं नाहीं. बरें तें भोंक पाडून मोठें करा. ह्मणजे आंतील सर्व चमत्कार दृष्टीस पडेल व जाण्यासही मार्ग चांगला होईल. तेव्हां मागील लोक

आणवून पाडण्यास आरंभ केला. परंतु हत्यारांशिवा-य तो काळाकुट्ट पाषाण कशानें पडतो. मग कांहीं मनुष्यें शहरांत पाठवून खोरीं, कुदळी, टिकाव, पहारा वगैरे हत्यारें आणवून पाडणारेही हुशार आणले. त्यां-नीं मोठ्या प्रयासानें पहाट होईतोंपर्यंत आंत मनुष्य उभें जाण्यासारखा रस्ता केला. तों प्रभात होऊन अरुणोदय झाला असल्यामुळें प्रकाशही बराच पड-ला. मग मशालीच्या उजेडांत आंत पहातां पर्व-ताला गुहा आहे एवढेंच समजलें. परंतु आंतलि कांहीं दिसण्यांत येईना. तेव्हां रूपसुंदरानें एकसा हुकूम फर्माविला कीं एका मागून एक असे एकदम लोक आंत जाऊन त्या लुच्चा माणसास कैद करा. आंत जास्त मनुष्यें असतील असें वाटत नाहीं. यःकश्चि-त् ठिकाणीं हल्लाकरण्यास जर असे भितां तर मग शत्रुवर तुटून कसें पडाल ? हें रूपसुंदराचें रागाचें भाषण ऐकतांच त्यांस शरम वाटली व त्यांनीं एकदम परमेश्वराचें नांव घेऊन " हरहरमहादेव " ह्मणत ढा-ला पुढें करून तरवारी सरसावून एका मागून एक पं-चवीस तीस असामी आंत गेले. मागून रूपसुंदरही गेला. चोहोंकडे फार लक्ष्य लावून पहातां त्यांस ए-का कोंपऱ्यांत एक स्त्रि बांधून टाकलेली दृष्टीस पड-ली, व सर्व लोक तिकडे धांवून गेले रूपसुंदर ह्मणा-ला, द्वार संभाळा, खड्गधारण करणारा तो दुष्ट घातकी मांग पळून जाईल. तेव्हां निम्मे लोक दरवा-जाचें संरक्षण करूं लागले. व रूपसुंदरादि त्या

स्त्रियेजवळ गेले. उजेड पुढें करतांच रूपसुंदर ह्मणाला, अरे तीचही माझ्या जिवलग मित्राची परम प्रिय अर्धांगी पुष्पावतीच ? हरहरदेवा ! ! माझ्या वहिनीची काय ही दशा ! ! असें ह्मणून शोक करूं लागला.

खचित पुष्पावती असें ह्मणतांच मंडळींनीं तिजला बंदमुक्त केलें मुखांतील मलिनवस्त्राचा बोळा काढिला व अगोदर बाहेर हवेंत आणिलें आणि मऊ बिछायत करून त्याजवर निजविलें. कांहींजन वारा घालूं लागले व बाकीचे आंतील दुष्टाच्या तपासास लागले. तेव्हां त्या गृहस्थास वाटलें, आज आपलीं शंभर वर्षे पूर्ण झालीं. आतां हे आपणांस जीवदान देतील याची आशाच नको. देवा ! शिकार सांपडली, पण तिचा सव्यय झाला नाहीं. अहाहा !! जर ही भेट मी आपल्या सरकारास सादर केली असती, तर मग काय मी प्रति राजाच बनलों असतों. परंतु दुष्प्रारब्धापुढें उपाय काय ! बरोबरच आहे, आपली एक जुनी ह्मण आहे "जसें करावें तसें भोगावें" क्षेत्रांमध्यें हरीक पेरून त्यापासून उत्तम सुवासिक आंबेमोहर तांदुळांची इच्छा करणें ह्मणजे तरटीपासून आम्रवृक्षाची फळ प्राप्ती करण्यासारखीच निर्फळ समजावयाची. पातकाचा परिणाम चांगला कसा होईल ! आतां " पश्चात्तापेन शुद्धता " काय कामाची ही बुद्धि जर पूर्वीं झाली असती, तर आज असा मृत्युचा घोर तर प्रसंग कां आला असता ? पण पूर्वसु-

कृतदुष्कृताप्रमाणें जें ज्यावेळेस होणार तें कसें चुकतें! एकेठिकाणीं दुर्वास ऋषि एवढे महानतपोनिधि परंतु ते सुद्धां नीचाच्या अन्नाला हार आले. आणि स्पष्ट ह्मणाले, कीं दुष्टाच्या अन्नाला गुण विपरीत व्हावयाचाच. तें अक्षरशः सत्य आहे. हा प्रसंग प्राप्त होण्याच्या पूर्वकाळापर्यंत मजला अशा प्रकारची उपरति बिलकुल झाली नाहीं. कशी होती, अन्नाचा गुणच तसा. पण आतां काय फळ! चला मरणास तयार व्हावें. आतां तरी कांहीं परमेश्वराचें नामाचा उच्चार करावा. "सब चीजोसे प्राण येही चीज बडी" आहे. त्यामुळें त्यास कांहीं सुचेना. प्राण कोणत्या युक्तीनें वांचवावा, यांत त्याचें मन गढून गेलें. शेवटीं त्यानें निश्चय केला कीं, सत्य वर्तमान सांगून क्षमा मागावी, मग जें करतील तें करोत. असा विचार करीत आहे; जो एका क्षणापूर्वीं त्या सुकुमार पुष्पावतीस कृतांतासारखा दिसत होता; त्या अधमास आतां हे शूरशिपाई यमदूतांसारखे दिसूं लागले. आंत शिपायांनीं सर्व ठिकाणीं शोध केला, परंतु तो त्यांस कोठें ही दिसेना तेव्हां त्यांस फार वाईट वाटलें. कारण इतक्या शिपायांची नजर चुकवून निघून गेला या वरून तो पक्का बिलंदर यांत संशय नाहीं. परंतु द्वार रक्षकांनीं खात्रीनें सांगितलें कीं, महाराज तो पक्का मांग आहे. आंतच कोठें दडून बसला असेल. आह्मीं खडा

पहारा करीत आहोंत; तो बाहेर गेला नाहीं, हें अगदीं खरें आहे तेव्हां लक्षपूर्वक बारीक रीतीनें पाहूं लागलें तों, ही स्वारी सर्वांगाचें वेटाळें करून, हातपाय पोटाशीं जुळून, खडकाला एक कोनाड्यासारखी जागा होती, त्यांत स्तब्ध बसलेली दृष्टीस पडली. मग काय ज्याप्रमाणें मेंढरावर लांडगे कोसळतात, तद्वतच ते सर्व शिपाई त्याजवर धांवले शेंडीला धरून त्यास खालीं ओढलें. मग काय करतो बिचारा ! ज्याने त्यानें लत्ताप्रहार करावा. असें तो मूर्छीत होईपर्यंत चाललें होतें. मग **रूपसुंदरानें** त्याच्या मुसक्या बांधवून बंदोबस्तानें नगरांत नेण्याचा हुकूम दिला. व आपण **पुष्पावतीच्या**जवळ आला. **पुष्पावती** अंमळ सावध झाली होती. ती तशीच मोठ्या कष्टानें उठून बसली. व **रूपसुंदरास** नमस्कार करूं लागली; तों **रूपसुंदर** म्हणाला, महाराज, हें काय आपली प्रकृति फार अशक्त झाली आहे, तर उठण्याचे श्रम कशाला घेतले. आणि हें असें न्यायविरुद्ध कसें करतां, आपण माझ्या धनिनी मीं आपणांस प्रणिपात करावयाचा, तें आपण कसें मला वंदन करतां. “ वळचणीचें पाणी आढ्याला कसें जाईल ” असो, आपण आज आम्हांस प्राप्त झालां, हें आमचें सुदैवच. जर आपण आज भेटलां नसतां, तर हा दीन **रूपसुंदर** खरोखर आपल्या दृष्टीस पडला नसता. परंतु त्या सर्वसाक्षी सर्वात्म्याच्या अंतःकरणांत या दासाबद्दल कांहीं करुणा आली म्हण.

हे चरण दृष्टीस पडले. पुष्पावती (हलके स्वरानें) म्हणाली, सर्वत्र मंडळी खुशाल आहेतना ?

रू०——त्या जगत्पालकाच्या कृपा कटाक्षानें सर्व खुशाल आहेत. पण विस्तीर्ण राज्य असून त्यास जर भूपाळ नाहीं, किंवा सभेंत पंडीत नाहीं तर जसें तें राज्य व ती सभा निस्तेज व उदास दिसते, तसें आपल्या विरहानें संपूर्ण नगर व आपली आत्म मंडळी खिन्न झालेली होती; परंतु त्या करुणाकरानें आज सर्वांचा परिताप दूर केला. इतक्यांत त्या जंगलाच्या बाह्यप्रदेशीं असलेल्या तिच्या मैत्रिणी दासी त्यांस अमृतापेक्षां ही सुवार्ता कळतांच त्या महदानंदानें धांवत इकडे आल्या. त्यांनीं पुष्पावतीच्या गळ्यास मिठी मारून जो कांहीं सखेदानंद प्रदर्शीत केला तो अवर्णनीय होय. सर्वत्र मंडळी पुष्पावतीस घेऊन अत्यानंदानें नगराकडे यावयास निघाली. नगरांत ही बातमी पसरतांच संपूर्ण नरनारी आपल्या धनिनीची भेट घेण्याकरितां सामोऱ्या आल्या आहेत. मग सर्वांसमवेत पुष्पावतीस राजवाड्यांत आणिलें. त्यावेळेस जसें निबिड काळोखानें दिशा प्रवर्तली असतां पूर्ण सुखकर असा चंद्रमा आपल्या कोमल किरणांनीं उदयपावून जिकडे तिकडे तो रमणिय शुभ्र प्रकाश सर्वांस संतोषीत करतो त्याप्रमाणें सगळी क्रीडावती नगरी हर्षयुक्त झाली आहे. नंतर रीतीप्रमाणें सर्वत्रांस शर्करादि विडे पानसुपारी देऊन बहुत

सत्कारानें निरोप दिला. विलासरंभेनं आपल्या प्रियकर कन्येस आलिंगन देऊन प्रेमानें तिचें मुख कुरवाळिलें. तिची फारच अशक्त तब्यत पाहून ती दुःखानें रुदन करूं लागली. तेव्हां शांतिकलेनें आतां रुदन करणें योग्य नाहीं, असें सांगून तिचें समाधान केलें.

भाग तेरावा.

तिसराप्रहराच्या सुमारास राजे **मदनराय**, प्रधान **प्रतापसिंह**, युवराज **मदनबाण**, प्रधानपुत्र **रूपसुंदर**, सेनापती **वीरबाहु** बावन उमरावादि मानकरी यांसहवर्तमान दरबार भरवून **पुष्पावतीस** नेणारा जो चांडांळ पाषाण हृदयी कैदी त्याच्या चौकशीस सुरवात झाली. त्यानें झालेली हकीकत अथपासून इतिपर्यंत खरेंपणानें निवेदन केली. इतक्यांत **पुष्पावतीकडील** कोणी कामगार येऊन म्हणाला, **पुष्पावती** बाईसाहेबानीं त्यास जीवदानाचें वचन दिलें आहे. तस्मात् हें लक्ष्यांत आणून जें करणें तें करावें. असा बाईसाहेबांचा निरोप आहे. तेव्हां निरुपायास्तव त्यास जन्मठेपेची शिक्षा सांगून निरुपद्रवी ठिकाणांत पाठवून दिला.

कांहीं दिवसांनीं **पुष्पावती** हुशार होऊन हिंडू फिरूं लागली; तेव्हां सर्वांचा आत्मा शांत झाला. एके दिवशीं अस्तमानच्या सुमारास पुष्पावती, चंप-

कमालती, पद्माक्षी, शशिप्रभा आणि, मंजुभाषिणी ह्या सुखदुःखाच्या गोष्टी बोलत आहेत.

चं०— बाई आपण नाहींत असं समजल्यापासून आपली भेट होईपर्यंत आमच्या चौघींच्या डोळ्यांचं पाणी खळलं नव्हतं. काय सांगावं मनांत ज्या एकेक कल्पना येईत त्यानं काळीज कसं दुभांगून जाई. पण त्या जगदंबेनं आपल्याला पुन्हा आह्मांस दाखविलं हें आमचं महाभाग्य.

प०—काल जेव्हां आह्मीं मोक्षतीर्थावर जाण्याकरितां निघालों तेव्हां आह्मांला आपली आठवण होऊन जें दुःख झालं तें शब्दांनीं बोलून दाखवितां येत नाहीं. आह्मीं एकसारख्या चारघटका खळखळां रडत होतों.

श०—आपली आमची मैत्री जडल्यापासून एकक्षणसुद्धां आपल्यावांचून आह्मांला करमलं नाहीं. मग कालच्या आनंदाच्या वेळीं कां बरं वाईट वाटणार नाहीं.

मं०—आपण असतांना ज्या ज्या लीला केल्या त्याची बाई आठवण झाली ह्मणजे आह्मी चौघींनीं कंठ मोकळा करून एकसारखं रडावं.

पु०— सख्यांनो तुमचं माझ्यावर निष्कपट प्रेम आहे. त्यामुळं तुह्मांला तसंच अनिवार दुःख व्हावयाचं. माझ्या नशिबी होतं, तें मला भोगावं लागलं. काय सांगूं एक परमेश्वर कृपा ह्मणूनच तुमच्या दृष्टीस पडल्यें. त्या मांगानं जें माझें हाल केलें तें कांहीं

पुसूंच नका. (असें ह्मणून आपलें साकल्य वर्तमान सांगतें) तें ऐकून दुःखीभाव दाखवून रागानें.

स०— मेल्या चांडाळा तोंडांत बोळा घालायला, आणि आंवळायला तुझे हात कसेरे वाहिले. मेल्या पाप्या मांगा रौरौ नर्कांतरे पडशील.

पु०— बायांनों जाऊं द्यातें, त्याचें आतां पुन्हा नांव घेऊं नका. फारादिवसांनीं तुमची माझी भेट झाली; तर कांहीं आनंदाच्या गोष्टी सांगा.

चं०— आपण भेटलां हा आनंदच झाला आहे. आणखी आपल्या मागंया मंजुभाषिणीचं मन पूर्वीं उदास होतं, कारण पती प्रेमानं किंचित् उलट खाली होती; परंतु भावोजींच्या आणि (लाजून) त्यांच्या सांगण्यावरून त्यानं तें सर्व ढंग सोडून आतां आमच्या सखीवर प्रीति करूं लागला. ती इतकी कीं आतां मंजुभाषिणी गळ्यांतला ताईतच होऊन बसली आहे.

मं०— पुरे **चंपकमालती**, तुला तरी पुष्कळच बोलयला पाहिजे. लोकं ताईत आणि तूंग पुतळी. तुझ्यावांचून एकल्याला नाटकसुद्धां पाहवत नाहीं.

प०— अग भांडूं नका सगळ्यांची स्थिती तशीच आहे अग जी ती आपापल्या पतीला आवडतीच आहे.

श०— हो बरोबरच आहे. इला दिवसाचं देखील कीर्तनाला जाऊं देत नाहींत. अक्षयीं जवळ पाहिजे.

पु०— तुझं काय कमी. मागं एकदां मी कशा-लासी तुला बोलवायला दासी पाठविली होती. तेव्हां तूं कुठंग होतीस !

चं०–कुठं ह्मणजे मंदिरांत मंचकावर पतीशेजारीं.

प०–इनंतर बाई आतां शर्थ केली. अग कांहीं तरी पडदा ठेवावयाचा होतास

श०–हो अक्षयीं मंचक आणि एकांत तिला दि-सतो आहे, तरी एकांताची हौस पुरी झाली म्हणून बरं आहे.

पु०–शशिप्रभे ह्मणजे काय. मी नाहीं यांतला अर्थ समजल्यें.

मं०–अर्थ तो काय समजायचा आहे, ती गर्भार आहे हो.

पु०–अस्सं कां बा फार चांगलं, माझी थट्टा करीत होती. आतां तूंग कां घाई केलीस !

चं०–मीचशीं काय बाकीच्यांनीं कुठं दमधरला आहे. सगळ्या गर्भार आहेत. •हा तुमचा प्रताप अगोदर तुम्ही आरंभ केला त्यानं दुसऱ्यांच्या मागंत्रास

पु०–माझ्यानंग तुह्मांला त्रास कसा. कांहीं तरी बोलतेस

प०–अगोदरच्या अभिमानाचा

चं०–तुम्हांला •ही तेंच पाहिजे व भावोजी तर दास, दासी, मैत्रिणी कोणी दिवस असो, सोंवळ्यांत असो, मनांत आलं पुरे कीं लागलीच मनगटाला ध-रून महालांत घेऊन जातात; आणि तुम्ही ही दासीं-

ची असो, पण आमचीसुद्धां लाज न बाळगतां मो-
ठ्या आवडीनं थाटांत निघून जातां. मग कशाला उशीर

प०—पण त्याची फळं आतां आपल्याला भोगावीं लागतात ना.

पु०—पुरे नाक वर करून नको बोलूं. फार लांबचें नको, कालच तुम्ही चौवीजणी कुठंग होता. माझी दासी एकीकीच्या घरीं चार चार हेलपाटे घालून आली. तुम्हाला ऊब कुठं सुटती आहे. इतक्यांत **मदनबाण** आल्याची बातमी दासीनें येऊन दिली. तेव्हां **चंपकमालती** वगैरे मैत्रिणी लगबगीनें मागच्या जिन्यानें उतरून निघून गेल्या. **मदनबाण** येतांच **पुष्पावती** नमस्कार करण्याकारितां जों खालीं वांकतें आहे तोंच **मदनबाणानें** तिजला तसेंच वरचें वर धरून तिजसुद्धां आपण मंचकावर बसला.

म०—— या सुकुमार नाजुक पुष्पाला आणि त्यांत गर्भभारानें त्रस्त झालेल्या शरिराला उगीच कां क्लेश द्यावेत. आदरातिथ्य नेहमींचेंच आहे. एखादे वेळेस जरी या मनमोहिनी कडून सत्कार झाला नाहीं, तरी रागयेणार नाहीं; व विस्मय हीं वाटणार नाहीं उलटा त्यापासून एकेप्रकारचा स्नेह भाव दृष्ट होऊन संतोषच होईल. असो, आतां तब्यत बरी आहेना.

पु०—त्या भगवानाच्या दयेनं व इकडील आशीर्वादानं प्रस्तुतकाळीं तर चांगलीं आहे. कांहीं पूर्वसुकृत होतं ह्मणून हे चरण दृष्टीस पडले. आणि हें प्रेमभाषण ऐकण्याचा प्रसंग आला. प्राणनाथ आ-

पण ह्मणालां तें ठीकच आहे. परंतु आम्हाला तर स्त्रीधर्माप्रमाणं वर्तन केलं पाहिजे.

म०—बरें तें असो प्रिये फार दिवस झाले, या गोंडस मृदु हातचा तांबूल नाहीं. तर आज तूं स्वतः विडा करून या प्राण्याची इच्छा तृप्त कर.

पु०—प्राणनाथ, मग यांत काय हें आमचं कर्तव्यच आहे. त्याबद्दल इतकें आर्जव तें कशाला !

म०—अहो पण आतां तुम्ही पहिल्या नाहींत; तुम्ही गरोदर, तुमचा जीव तुह्माला जड झाला आहे. तेव्हां करवेल किंवा नाहीं, याचा संशय वाटला.

पु०—पुरे मेलं, प्राणनाथ किती तरी थट्टा करावी.

म०—सखे, विलोलनयने काय सांगूं, त्या दुरात्म्या क्रूरसेनाच्या सैन्याचा मोड केला, त्याचें नगर लुटलें, व त्याच्या गादीवर तेथील प्रधानपुत्रास बसविलें; आणि विजयी होऊन येथें आलों. परंतु जेव्हां तूं नाहींस ही दुष्ट वार्ता कर्णीं पडली तेव्हां पासून आपण शुद्धींत होतों असें मला कांहीं वाटत नाहीं. जसें कुडींतून प्राण निघून गेला असतां जशी ती तनु निस्तेज व निरुपयुक्त होते. तद्वत माझे पंचप्राण जी तूं, ती नाहींशी झाल्यामुळें माझी ही मृतासारखी अवस्था झाली होती. असो, तें स्मरण झालें असतां खेदाला कारण होतें. प्रिये खरोखर तुझ्यावांचून मी फार दिवस वांचलों नसतों.

पु०—पुरे इडापीडाटळो आणि अमंगळ पळो. (असें ह्मणून आपले दोन्ही हात त्याच्या मस्तकास

लाऊन आपल्या कर्णापाशीं नेऊन भुईवर आपटते,) बरं प्राणनाथ मी जर आपलं वृत्त आपणांस कथन केलं, तर बाई काय होईल कोणाला ठाऊक त्या एकेका वेळेची आठवण झाली कीं रडूंच येतें. असो मग मी आपली सर्व हकीकत प्राणनाथांना श्रुत करीन (असें ह्मणून केतकी सारखा सुवाशिक पक्कयापानांचा विडा करून मदनबाणाच्या मुखांत घातला एकमेकांनीं परस्परांची चुंबनें घेऊन अलिंगनें दिलीं. अशा प्रकारें उभयतांनीं वियोगजन्य दुःखाचें परिमार्जन केलें पुष्पावतीनें आपली ती विपत्तीकारक हकीकत सांगितली. तेव्हां उभयतांच्या ही नेत्रांतून टपटप दुःखाश्रु पडले. त्या दुःखावेशांत **मदनबाण** म्हणाला, प्राणसखे, हा कसला तुझा मायाळू स्वभाव, ज्या ज्या गृहस्थानें असा तुझा छळ केला; त्यास तूं जीवदान दिलेंस, काय म्हणावें तुला. बरें आतां तुला प्रेमानंदानें इतकेंच सांगतों कीं, जी वस्तू तुला खाविशी वाटेल, किंवा जो अलंकार घालावासा वाटेल, किंवा ज्या सुंदर जिनसेवर तुझी इच्छा जाईल किंवा जो मानसांत हेतु उत्पन्न होईल, तो लज्जेस्तव न भितां निःशंकपणें मजला सांगतजा. मी ते तुझे मनोरथ तात्काळ परिपूर्ण करीन. प्रियत्तमे माझे हें बोलणें विनोदी समजूं नको. अग शास्त्राधारच असा आहे. त्यावरून पुढील संततीची परीक्षा होत असते.

पु०–प्राणनाथ, काय तरी सांगणं. डोहळ्यावरून कसं बाई परीक्षण होईल? कांहीं तरी आपलं सांगायचं.

म०—छेः छेः प्रिये, सत्य आहे. ह्मणजे नसें त्याचें लक्षण असेल त्याप्रमाणें डोहाळे व्हावयाचे. आपल्यांत एक म्हण आहे, कोणी मनुष्य दुर्वर्तन करूं लागला असतां त्यास म्हणत असतात हें पुढचे डोहाळे

पु०—होबाई, प्राणनाथ, असं म्हणतात खरं.

म०—बरें आतां जातों. तुझ्या ह्या मधुर भाषणांत गर्क झालों ह्मणजे मग बाहेरचें भानसुद्धां राहत नाहीं. आज मी कितीवेळ येथें बसलों आहे. **रूपसुंदर** येऊन हवा घेण्यास जाण्याकरितां वाटपहात बसला असेल.

पु०—हो हो प्राणनाथ, अंमळ थांबावं. आपणांस कांहीं कळलं आहे कां.

म०—काय तें,मलाबोवा कांहीं कमजास्त कळले नाहीं.

पु०—अहो भावोजींची स्त्री **चंपकमालती** गर्भार आहे. मी आज पुरती चौकशी केली (आज **चंपकमालती** येथें आली होती) तों खरंच तिला पांचवा महिना असावा.

म०— वा फार आनंदाची गोष्ट. ईश्वरी संकेतच असा आहे कीं काय ! आमचे मित्रांचे सर्वच हेतु बरोबर साध्य व्हावेत. मी ही आतां या बद्दल **रूपसुंदरास** विचारितों.

पु०— प्राणनाथ, पण भावोजींना माझं नांव सांगूं नका. नाहींतर सखी **चंपकमालती** माझी उद्यां खरडच काढील.

म०— मी कशाला तुझें नांव सांगूं. परंतु तें

आपापच कळेल. तो किती चतुर, तो तेव्हांच तर्क करील कीं, इकडूनच ही बातमी यांना कळली असावी. बरें आतां जाऊं दे. आतां जातांच एक मधुर. (असें ह्मणून तिचें मुख चुंबन घेऊन निघून जातो)

इकडे **रूपसुंदरही** येऊन वाट पहात बसलाच होता. मग उभयतां रथांत बसून उपवनाकडे निघून गेले. बागेंत फिरत असतां.

म०— मित्रा **रूपसुंदरा** तुझी आमची किती सरळ प्रीति ही. आणि परमेश्वरी योगायोगही तसाच अनुकूळ. आपले उभयतांचे संपूर्ण मनोरथ एकदम पूर्णत्वास पावतात. प्रभुलीला अगाध आहे. अरे माझा तुझा विवाह बरोबरच झाला. व पुत्रसुखही बरोबरच मिळण्याचा रंग दिसत आहे. कायरे तूं अंतरज्ञानी आहेस, किंवा आपली इच्छा परिपूर्ण करण्याचें सामर्थ्य तुजमध्यें आहे. तुझ्याआंगीं असा कोणता विचित्र गुण आहे. आमची प्रिया गरोदर झाल्या बरोबर वहिनीही गरोदर असल्याची बातमी कळते. तेव्हां हें प्रभुसूत्र अघटितच खरें. असो चला आतां. आज बागेंत येण्यासमुळीं उशीर झाला होता. तर चला नगरांत जाऊं. (नंतर उभयतां रथांत येऊन बसले व बरोबरच्या मंडळीसुद्धां नगराकडे आले)

रात्रौ **रूपसुंदर** महालांत जाऊन विलासांत एकमेकांचें विनोदपर भाषण चाललें असतां ह्मणाला, कां ! आज स्वारी राजवाड्यांत गेली होती वाटतें. त्या शिवाय हें गुप्त प्रकरण बाहेर आलेंच नाहीं.

चं०— प्राणनाथ, काय बाई असं गुह्य आपणांस कळलं आहे !

रू०— दुसरें काय, लौकर पुत्रमुख दृष्टीस पडण्याचें.

चं०—काय बाई आतां शर्थ झाली. पुष्पावतीस एवढंसुद्धां आपल्या प्रियकरापाशीं सांगितल्याशिवाय राहवलं नाहींना ! तिच्या जिभेला कांहीं हाड नाहीं वाटतं.मी आतां उद्यां तिची चांगलीच फजिती करीन.

पुष्पावतीस पुन्हा डोहोळेजेवण करण्याचा बेत झाला. तिच्याबरोबर तिच्या मैत्रिणी चंपकमालती, पद्माक्षी, शशिप्रभा, आणि मंजुभाशिणी ह्यानांही डोहोळेजेवण केलें. तेव्हां तो सुंदर देखावा अलौकिक दिसला. मदनबाण पुष्पावती, रूपसुंदर चंपकमालती, सूर्यकांत पद्माक्षी, प्रेमानंद शशिप्रभा, आणि कमलप्रिय मंजुभाशिणी हीं दंपत्यें ओळीनें सांगत बसलेलीं पाहून राजे राण्यादि सर्वत्रांस बहुत संतोष झाला. पहिल्यापेक्षांही जास्त समारंभानें ती सर्व रात्र निर्विघ्नपणें शेवटास गेली.

नवमास परिपूर्ण होत्साता दशममासीं पुष्पावती प्रातःकालच्या सुमारास प्रसूत झाली. पुत्ररत्न झालेलें आहे.मग काय त्या आनंदाला मर्यादाच नाहींशी झाली आहे. पुत्रोत्साहास आरंभ झाला. नगरशृंगारलें, गुढ्या तोरणें उभारलीं, हस्तीवर शर्करा वाटलीं, याचकांचे हेतु पूर्ण केले, आणि ब्राह्मण संतर्पणें सुरू झालीं.

राजानें पुत्रमुख अवलोकन करून जातकर्म, नाम-

कर्म, वगैरे विधी केले. द्वादशादिन तो आनंद सोहळा सारखा थाटानें होऊन बारसेंहीं त्याप्रमाणें उत्कृष्ट झालें. त्याचें नामाभिधान परम प्रीतीनें पुष्पसेन असें ठेविलें. या समयास मदनबाणाचा श्वशुर अनंगपूरचा राजा कुसुमचाप व भद्रपूरचा राजा चंद्रसेन, प्रधान, हे स्त्रियांसह तेथेंच होते. मग दिनमासांनीं तो पुष्पसेन वाढूं लागला. ती बाळलीला व तें पुत्राचें गोरें गोरें गोजीरवाणें सुंदर मुख पाणीदारनेत्र, सरळ नाशिक, नाजुक बारीक हस्त, सुकुमार पावलें, दिव्य कांति, पाहून सकळ आप्तादि नागरिकांना बहुत सुख झालें.

कांहीं दिन लोटल्यावर चंपकमालतीही सायंकाळच्या सुमारास उत्तम सुस्वरूप दिव्यपुत्रातें प्रसवती झाली. सदरीलप्रमाणेंच आनंदोत्सव होऊन त्याचें नांव शृंगारनाथ असें ठेविलें पुढें कांहीं दिवसांनीं त्याच्या इतर मैत्रिणींना हीं पुत्र झाले. यासमयीं सगळें नगर संतुष्ट असोन सुखी होतें.

तीं दोन्हीं तान्हीं सुंदर बाळकें मोठ्या लडिवाळपणानें एकमेकांबरोबर खेळतांना पाहून त्यांच्या आजोबांना व अज्यांना फार कौतुक वाटून संतोष होत असे.

या वेळेस मदनराय राजाच्या मनांत आलें कीं, आपला वृद्धपकाळ झाला आहे पुत्रही राज्य करण्यास वयानें योग्य, झाला असोन, गुणानें तर फार मान्य आहे. तर आतां राजरूपी शकटाचें जूं, आपल्यावरचें

काढून पुत्राच्या स्वाधीन करावें. व आतां आपण आं-पलें राहिलेलें आयुष्य पारमार्थिक साधनांत लावावें. सांप्रतचा योगही फार उत्कृष्ट आलेला आहे. पाचा-रण करूनही हें राजमंडळ यावयाचें नाहीं. तर सर्व-त्रांच्या अनुमतानें पुत्रास राज्याभिशेक करावा असा पूर्ण विचार करून दरबार भरविला. आणि प्रजाज-नांसुद्धां सर्वांस आपला हेतु कळविला. तेव्हां संपूर्णांस तो स्तुत्य हेतु पाहून संतोष झाला. मग सुमुहूर्तावर **मदनबाणास** राज्याभिषेक केला. नगरांत त्याच्या नांवाची द्वाही फिरविली. नाणें पाडिलें. शिका कर-विला ; व सर्व राज्यकारभार मोठ्या संतोषानें त्याचे स्वाधीन केला. त्याचप्रमाणें प्रधानाचा अधिकार **रूप-सुंदरास** दिला. उभयतांस नीतिकथन करून सुबोध केला. अन्यदेशीय राजे आपापल्या नगरीं निघून गेले. राजे मंत्री व त्यांच्या स्त्रिया हीं मंडळी आपलें पुढील आयुष्य सत्कर्म व ईश्वरभजनांत घालवूं लाग-ली. **मदनबाण** राजा आपल्या कुशल **रूपसुंदर** प्र-धानासमवेत न्यायानें, प्रजेच्या संतोषानें आणि परमे-श्वरास भिऊन सदाचरणानें राज्य चालवूं लागला.

समाप्त.